



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com






* वर्ष ६५ वे * अंक १२७ * नांदेड * गुरूवार, दि. १४ मे २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


# नीट पेपरफुटीत सीबीआयच्या कारवाईला वेग; आतापर्यंत पाच जणांना अटक

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** नीट परीक्षेचा पेपर फुटल्यामुळे संपूर्ण देशभरात गोंधळाचं वातावरण निर्माण झालं आहे, तसेच नीट परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांमधून देखील संताप व्यक्त केला जात आहे. दरम्यान या प्रकरणात आतापर्यंत सीबीआयने पाच जणांना अटक केलं आहे. अटक करण्यात आलेल्या पाच पैकी तीन जण हे राजस्थान जयपूर येथील आहेत, तर एक जण महाराष्ट्रातील असून, एकाला हरियाणा राज्यातील गुरुग्राम येथून अटक करण्यात आली आहे.



समोर आलेल्या माहितीनुसार महाराष्ट्राच्या नाशिक येथून नीट पेपर फुटीप्रकरणात शुभम खैरनार याला अटक करण्यात आलं आहे. तर मांगीलाल बिवाल, विकास बिवाल आणि दिनेश बिवाल यांना राजस्थानमधील जयपूर येथून अटक करण्यात आली आहे. तर यश यादव नावाच्या व्यक्तीला हरियाणा येथील गुरुग्रामामधून सीबीआयने अटक केली. सरकारने या प्रकरणाचा तपास सीबीयाकडे सोपवल्यानंतर नीट पेपर फुटी प्रकरणात आतापर्यंत अनेक धक्कादायक खुलासे समोर आले आहेत. या प्रकरणात आणखी काही जणांना अटक होऊ शकते अशी शक्यता वर्तवली जात आहे.

दरम्यान दुसरीकडे या प्रकरणात महाराष्ट्रातून अटक करण्यात आलेला आरोपी शुभम खैरनार याच्या भावाला देखील सीबीआयने चौकशीसाठी ताब्यात घेतलं आहे. भावेश खैरनार असं चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपी शुभम खैरनार याच्या भावाचं नाव आहे.

### पुण्यातील ब्युटी पार्लर चालवणाऱ्या महिलेला अटक

नीटचं नाशिक कनेक्शन समोर आल्यानंतर तपासात पुणे पोलिसांनी बुधवारी पहाटे मनीषा वाघमारे या महिलेले ताब्यात घेतले आहे. संबंधित महिला ब्युटी पार्लर चालवत असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. ४६ वर्षीय मनिषा ही पुण्यातील बिबडेवाडी परिसरात राहत असून तिनेच विद्यार्थ्यांना आरोपीपर्यंत पोहोचविण्याचं काम केल्याचा संशय आहे.

### पेपरफुटीप्रकरणी लातूरात चार जणांची चौकशी

नीट २०२६ पेपरफुटी प्रकरणात लातूर कनेक्शन समोर येण्याची शक्यता अधिक गडद होत आहे. एका विद्यार्थिनीच्या पालकांनी केलेल्या तक्रारीनंतर लातूर पोलिसांनी तपासाची गती वाढवली असून संशयाच्या भोवऱ्यात असलेल्या खासगी क्लासेसची सखोल चौकशी सुरू केली आहे. या प्रकरणात संबंधित क्लास चालकाच्या कार्यालयातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली जात आहे. बुधवारी पहाटे दोन जणांची आणि त्यानंतर आणखी दोन जणांची चौकशी करण्यात आली असून आतापर्यंत एकूण चार जणांचे जबाब नोंदवण्यात आले आहेत.

# तामिळनाडूमध्ये अण्णाद्रमुक पक्षात अखेर उभी फूट

## मुख्यमंत्री विजय यांना बहुमताच्या चाचणीत अण्णाद्रमुकच्या २५ बंडखोर आमदारांचा पाठिंबा

**चैन्नई (प्रतिनिधी)–** तामिळनाडू विधानसभेत विजय यांच्या सरकारने विश्वासदर्शक ठरावाची अग्निपरीक्षा पास केली. सभागृहात एकूण १७१ आमदार उपस्थित होते. टीव्हीकेला १४४ मते मिळाली, जी बहुमतापेक्षा ५८ मतांनी अधिक होती. यामध्ये ४७ आमदार असलेल्या एआयएडीएमकेच्या २५ बंडखोर आमदारांच्या मतांचा समावेश होता.

विश्वासदर्शक ठरावाच्या विरोधात पडलेली २२ मते उर्वरित एआयएडीएमकेच्या आमदारांनी दिली. ५९ आमदार असलेल्या डीएमकेने सभागृहातून सभात्याग केला. पाच आमदार (पीएमकेचे ५ आणि भाजपचा १) अनुपस्थित होते. अध्यक्षांनी मतदान केले नाही. शिवाय, उच्च न्यायालयात एक खटला प्रलंबित असल्याने टीव्हीकेचा एक आमदार मतदानात सहभागी होऊ शकला नाही. या क्रॉस–व्होटिंगमुळे एआयएडीएमकेमध्ये फुट पडली आहे. पक्ष पलानीस्वामी आणि सी. व्ही. षण्मुगम या दोन गटांमध्ये विभागला गेला.

सभागृहातील विरोधी पक्षनेते उदयनिधी स्टॅलिन यांनी विजय यांच्या बंडखोर एआयएडीएमके आमदारांसोबतच्या बैठकीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. ही बैठक तडजोड होती की सौदा, असा प्रश्न त्यांनी विचारला. हेच का तुमचे स्वच्छ सरकार? यावर उत्तर देताना मुख्यमंत्री विजय म्हणाले, आमचे सरकार धर्मनिरपेक्ष गतीने काम करेल आणि घोडेबाजारात गुंतणार नाही. विरोधी पक्षनेते आणि डीएमके नेते उदयनिधी स्टॅलिन यांनी टीव्हीके सरकारवर निशाणा साधत म्हटले होते की, सरकारने इन्स्टाग्राम रील्स नव्हे, तर खरा कारभार केला पाहिजे.

एआयएडीएमकेच्या बंडखोर आमदारांचे नेतृत्व करणारे एस. पी. वेलुमणी यांनी जाहीर केले की, त्यांचा गट विश्वासदर्शक ठरावात टीव्हीकेला पाठिंबा देईल. वेलुमणी म्हणाले की, बहुसंख्य जनतेने मुख्यमंत्र्यांना निवडून दिले आहे, त्यामुळे एआयएडीएमकेचा बंडखोर गट विश्वासदर्शक ठरावाच्या बाजूने उभा आहे.

दरम्यान, तामिळनाडू विधानसभेत बहुमत सिद्ध झाल्यानंतर काही तासांतच, मुख्यमंत्री विजय यांनी ज्योतिषी राधन पंडित यांना विशेष कार्य अधिकारी पदावरून हटवले. विजय यांनी त्यांची या पदावर नियुक्ती केली होती, परंतु विरोधी पक्ष आणि मित्रपक्षांच्या विरोधामुळे त्यांना हा निर्णय मागे घ्यावा लागला. राधन हे बऱ्याच काळापासून विजय यांच्या जवळचे मानले जातात. त्यांनी विजय यांच्या मुख्यमंत्रीपदी निवडीचे भाकीत केले होते. त्यांच्या सल्ल्यानुसार त्यांचा शपथविधी सोहळा १० मे रोजी आयोजित करण्यात आला होता.

# पाकिस्तानी गँगस्टरप्रकरणी नांदेडातून एटीएसने दोघांना घेतले ताब्यात

**नांदेड (प्रतिनिधी)–** पाकिस्तानी गँगस्टर शहजाद भट्टीविरोधात महाराष्ट्र दहशतवाद विरोधी पथकाने मोठी कारवाई सुरू केली आहे. या अनुषंगाने नांदेडातही एटीएसकडून दोघांना ताब्यात घेऊन चौकशी करण्यात आली आहे.

दहशतवादी भरती आणि हेरगिरीशी संबंधित प्रकरणांमध्ये शहजाद भट्टीचे नाव समोर आले आहे. त्याचबरोबर सोशल मिडियाच्या माध्यमातून तो तरुणांना जाळ्यात ओढत आहे. त्यामुळे केंद्रीय आणि राज्य सुरक्षा यंत्रणांनी त्याच्या हालचालीवर लक्ष केंद्रीत केले असून बुधवारी राज्यभरात धाडी टाकून शहजाद भट्टी किंवा त्याच्या डोगर गँगशी संपर्कात असलेल्या ५७ व्यक्तींची माहिती गोळा केली जात आहे. त्याच अनुषंगाने नांदेड शहरातील देगलूरनाका आणि इतवारा भागात राहणाऱ्या दोन तरुणांना त्यांच्या घरुन ताब्यात घेतले. त्यानंतर चौकशी करुन काही न आढळल्याने त्यांना सोडून देण्यात आले.

# शेअर मार्केटमध्ये नफा मिळवून देण्याचे आमिष; ६१ लाखांना गंडविले

## शिवाजीनगर ठाण्यात गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)–** कमी काळात, कमी पैशात श्रीमंत होण्यासाठी उतावीळ झालेली काही मंडळी आमिषाला बळी पडून आपली फसगत करून घेतात. असाच एक प्रकार नांदेडमध्ये उघडकीस आला. शेअर मार्केटमध्ये नफा मिळवून देतो, असे आमिष दाखवून परभणी जिल्ह्यातील पूर्णा येथील काही महिलांची ६१ लाख ४६ हजार रुपयांची फसवणूक करणाऱ्या दोघांविरुद्ध शिवाजीनगर पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

परभणी जिल्ह्यातील पूर्णा येथील व सध्या नांदेडच्या अभिजीतनगर भागात वास्तव्यास असलेल्या जयश्री गजानन कदम (वय २८) व त्यांच्या काही ओळखीच्या व्यक्तींना शहराच्या विजयनगर भागात राहणारे संदीप तंवर आणि वैशाली तंवर या दोघांनी विश्वासात घेतले. ओळखीचा फायदा उचलत त्यांना शेअर मार्केटच्या माध्यमातून मोठा नफा मिळवून देतो असे खोटे आश्वासन दाखवून जयश्री कदम आणि त्यांच्या सोबतच्या इतर काही जणांनी लालसेपोटी ६१ लाख ४६ हजार




रुपये संदीप तंवर आणि वैशाली तंवर यांना दिले. यात काही ऑनलाईन तर काही रोख रकमेचाही समावेश आहे, परंतु पैसे भरल्यानंतरही त्याचा परतावा व मूळ रक्कमही परत मिळत नसल्याने जयश्री कदम यांनी वरील दोघांनाही या संदर्भात विचारपूस केली असता त्यांनी उडवाउडवीचे उत्तरे दिली. आपली व अन्य सहकाऱ्यांची फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर जयश्री कदम यांनी शहराच्या शिवाजीनगर पोलीस ठाण्यात तक्रार दिली. हा सर्व प्रकार २ मे २०२३ च्या दुपारी अडीच ते १२ जून २०२४ रोजी सायंकाळी सातच्या दरम्यान विजयनगर भागात आरोपींच्या घरी घडला होता. शिवाजीनगर पोलिसांनी या प्रकरणात सखोल चौकशी करून वरिष्ठांच्या आदेशावरून अखेर संदीप तंवर आणि वैशाली तंवर या दोघांविरुद्ध भारतीय दंड विधान संहितेच्या फसवणुकीसह कलम २१, २२, २३ अनियंत्रित ठेव योजनांवर बंदी कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणाचा तपास सहायक पोलीस निरीक्षक संदीप थडवे करत आहेत.

# महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षांमधील 'ऑप्टिंग आऊट' आणि 'संमती' पर्याय रद्द

**मुंबई (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने (एमपीएससी) भरती प्रक्रियेत महत्त्वाचा बदल करत उमेदवारांना उपलब्ध असलेले 'ऑप्टिंग आऊट' तसेच 'संमती' हे पर्याय रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे.यासंदर्भातील प्रसिद्धीपत्रक आयोगाने जारी केले आहे.

आयोगाने भरती प्रक्रियेत सुधारणा करण्याच्या उद्देशाने यापूर्वी 'ऑप्टिंग आऊट' ही संकल्पना लागू केली होती. त्यानुसार निवड यादीतील उमेदवारांना भरती प्रक्रियेतून स्वेच्छेने बाहेर पडण्याचा पर्याय देण्यात आला होता. मात्र, या पर्यायासंदर्भात आयोगाच्या बैठकीत चर्चा झाल्यानंतर आता हा पर्याय रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

यापुढे आयोगामार्फत आयोजित सर्व परीक्षांसाठी भरती प्रक्रियेतून बाहेर पडणे तसेच संमती देणे हे पर्याय उपलब्ध राहणार नाहीत. एकल संवर्गाच्या भरती प्रक्रियेसाठी प्रतिक्षा यादी कार्यान्वित राहील व बहुसंवर्गीय पदांच्या भरती प्रक्रियेसाठी प्रतिक्षा यादी राहणार नाही.

# उन्हाळी सुट्टीत शिक्षक समायोजन प्रक्रिया राबविण्याचे आदेश

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागाकडून उन्हाळी सुट्टीच्या कालावधीत अतिरिक्त शिक्षक समायोजन प्रक्रिया राबविण्याचे आदेश देण्यात आल्याने जिल्ह्यातील शिक्षक संघटना व शिक्षकांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. शिक्षण विभागाने दि. ७ मे २०२६ रोजी जारी केलेल्या आदेशानुसार दि. १४ मेपूर्वी तालुकास्तरावरील समायोजन प्रक्रिया पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या.

दरम्यान, राज्यभर जनगणनेची तयारी सुरू असून १४ मेपासून प्रत्यक्ष जनगणना कार्याला सुरुवात होणार आहे. अशा परिस्थितीत शिक्षकांवर आधीच विविध प्रशासकीय कामांचा ताण असताना समायोजन प्रक्रिया राबविणे योग्य नसल्याचा सवाल शिक्षक संघटनांकडून उपस्थित करण्यात आला होता.

महाराष्ट्र शासनाने यावर्षी विविध विभागांच्या बदल्या स्थगित केल्या असताना शिक्षण विभाग मात्र घाईघाईने समायोजन प्रक्रिया राबवत असल्याने शिक्षकांमध्ये संभ्रम आणि असंतोषाचे वातावरण निर्माण झाले होते. जिल्ह्यात मुख्याध्यापक, शिक्षण विस्तार अधिकारी तसेच केंद्रप्रमुख यांच्या मोठ्या प्रमाणावर जागा रिक्त आहेत. विशेषतः मुख्याध्यापक पदांच्या सुमारे ३०० जागा रिक्त असल्याने प्रथम पदोन्नती प्रक्रिया राबवून त्यानंतरच समायोजन करावे, अशी मागणी शिक्षक संघटनांकडून सातत्याने करण्यात येत होती.

यासंदर्भात नांदेड जिल्ह्यातील सुमारे ६० शिक्षकांनी औरंगाबाद खंडपीठात रिट याचिका क्रमांक ३९८०/२०२६ दाखल केली होती. पदोन्नती प्रक्रिया पूर्ण न करता समायोजन राबविणे अन्यायकारक असल्याचा मुद्दा न्यायालयात मांडण्यात आला.

या प्रकरणी बुधवारी तातडीची सुनावणी घेण्यात आली. सुनावणीनंतर न्यायालयाने शिक्षक समायोजन प्रक्रियेला जैसे थे ठेवण्याचे निर्देश दिले आहेत. पाच आठवडे मुदत दिली आहे तसेच न्यायालयाच्या पुढील आदेशापर्यंत संबंधित शाळांमधील सद्यस्थिती कायम ठेवावी तसेच न्यायालयाच्या निर्देशांचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यावी, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

याबाबत प्रतिक्रिया देताना याचिकाकर्ते तथा महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे प्रवक्ते रवी ढगे यांनी सांगितले की, जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर रिक्त पदे आहेत. प्रथम पदोन्नती प्रक्रिया राबवून शिक्षकांना न्याय द्यावा. त्यानंतरच समायोजन प्रक्रिया राबविणे प्रशासनासाठी आणि शिक्षकांसाठीही योग्य ठरेल.

यावेळी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे जिल्हाध्यक्ष व्यंकटराव गंधपवाड तसेच माधव बारमाळे यांनीही शिक्षकांच्या मागण्यांनासमर्थनदेतप्रशासनानेन्यायालयाच्या निर्देशांचे पालन करावे, अशी मागणी केली.

# अमूल दूध आजपासून २ रुपयांनी महागणार

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** अमेरिका आणि इराण यांच्यातील संघर्षामुळं कच्चा तेलाच्या दरात मोठी वाढ झाली आहे. यामुळं गेल्या काही दिवसांपासून पेट्रोल आणि डिझेलच्या दरात वाढ होईल, अशा चर्चा सुरु होत्या, मात्र अमूलने दूध दरामध्ये वाढ करण्याचा मोठा निर्णय घेतला आहे.

अमूलच्या या दूध दरवाढीच्या निर्णयामुळं सर्वसामान्य माणसांच्या खिशावर परिणाम होणार आहे. अमूलच्या दूध दरात वाढ झाल्याचं आजपासून पाहायला मिळेल. अमूल या दूधराच्या ब्रँडनं एक लीटर दुधाचे दर २ रुपयांनी वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. नवे दर १४ मेपासून लागू होणार आहेत. अमूलकडून ही दरवाढ करताना काही कारणं देण्यात आली आहे.

# इंधन बचतीसाठी ताफा कमी करण्याची राज्यपालांची सूचना


**मुंबई (प्रतिनिधी)–** प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलेल्या आवाहनानुसार पेट्रोल व डिझेलचा वापर कमी करण्याच्या आणि मर्यादित संसाधनांच्या कार्यक्षम वापरास प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी आपल्या ताफ्यातील वाहनांची संख्या कमी करण्याच्या दृष्टीने सूचना केल्या आहेत.



राज्यपालांनी राज्य शासनाच्या गृह विभागाला विद्यमान सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेऊन त्यांच्या ताफ्यातील वाहनांची संख्या कमी करण्याची शक्यता तपासण्याचे निर्देश दिले आहेत. गृह विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव मनीषा म्हैसकर यांना पाठविलेल्या पत्रात राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे यांनी राज्यपालांच्या सुरक्षेचा आढावा घेऊन ऊर्जा बचतीच्या अनुषंगाने वाहनांची संख्या निर्धारित करण्याच्या राज्यपालांच्या सूचना कळवल्या आहेत.

मर्यादित संसाधनांचा जबाबदारीने वापर करण्याला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने राज्यपालांनी सदर सूचना केल्या आहेत.




# नगरसेवक मतीन पटेल यांच्या घरावर बुलडोझर

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)–** छत्रपती संभाजीनगरमध्ये एआयएमआयएम नगरसेवक मतीन पटेल यांचे घर आणि कार्यालय बुधवारी सकाळी बुलडोझरने पाडण्यात आले. ही कारवाई महानगरपालिकेने अनधिकृत बांधकामाच्या प्रकरणात केली आहे. नाशिकमधील टीसीएस कंपनीतील अत्याचार आणि धर्मांतर प्रकरणातील आरोपी निदा खानला ७ मे रोजी छत्रपती संभाजीनगर येथून अटक करण्यात आली होती. मतीन पटेलने तिला आपल्या घरात आश्रय दिला होता. यानंतर ९ मे रोजी महानगरपालिकेने अनधिकृत बांधकामाबाबत नोटीस बजावली होती आणि ७२ तासांत उत्तर मागितले होते.

# केंद्र सरकारची सोने-चांदीवरील आयात शुल्कात जबर वाढ; सोने महागले

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** केंद्र सरकारने सोने–चांदीवरील आयात शुल्कात मोठी वाढ केल्यामुळे देशांतर्गत बाजारपेठेत या मौल्यवान धातूंच्या किंमतीत मोठी वाढ झाली आहे.

या निर्णयामुळे मल्टी कमोडिटी एक्सचेंजवर चांदीच्या जुलै २०२६ च्या फ्युचर्समध्ये प्रति किलो १६,७४३ रुपयांची वाढ होऊन ती २,९५,८०५ रुपयांवर पोहोचली. सोन्याच्या जून २०२६ च्या फ्युचर्समध्ये प्रति १० ग्रॅम ९,२०६ रुपयांची (६ टक्के) वाढ होऊन किंमत १,६२,६४८ रुपये झाली. दुसरीकडे, अमेरिकेतील ग्राहक महागाई एप्रिलमध्ये वेगाने वाढल्या मुळे, फेडरल रिझर्व्हकडून व्याजदर कपातीची अपेक्षा कमी झाली आहे, ज्याचा परिणाम जागतिक बाजारपेठेतील वातावरणावर झाला आहे.

सरकारने सोन्या आणि चांदीवरील एकूण आयात शुल्क ६ वरून वाढवून १५ टक्के केलं आहे. यामध्ये १० टक्के मूलभूत सीमा शुल्क आणि ५ टक्के कृषी पायाभूत सुविधा आणि विकास उपकर यांचा समावेश आहे. आयात शुल्क वाढीच्या बातमीमुळे कल्याण ज्वेलर्स आणि टायटन सारख्या ज्वेलरी कंपन्यांच्या शेअर्समध्ये ६ टक्क्यांपर्यंत घसरण पाहायला मिळाली. हे बदल मध्यरात्रीपासून लागू करण्यात आले असून, यामुळे आगामी काळात सोन्या-चांदीच्या मागणीवर आणि किंमतीवर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील

# बदलती राजकीय विचारधारा

नुकत्याच झालेल्या पाच राज्यांतील निवडणुकांवरून भारतीय राजकारणात आज दोन भिन्न प्रवाह स्पष्ट दिसत आहेत. एकीकडे विचारधारेवर आधारित जनमताची उभारणी, तर दुसरीकडे कल्याणकारी योजनांवर आधारलेली लोकानुनयी राजकारणाची परंपरा. भारतीय राजकारणात बदलाच्या नव्या चर्चांना सुरुवात झाली. यापैकी दोन राज्यातील सत्तांतर हे सर्वाधिक महत्त्वाचे आहे. ते म्हणजे पश्चिम बंगालमध्ये सुवेंदू अधिकारी आणि तामिळनाडूमध्ये तमिळगा वेत्री कळघमचे प्रमुख सी. जोसेफ विजय यांनी हस्तगत केलेली सत्ता. या दोघांची राजकीय पार्श्वभूमी, विचारधारा आणि लोकांसमोर मांडलेले आश्वासनांचे स्वरूप पूर्णपणे वेगळे असले, तरी त्यांच्या समोरची खरी कसोटी एकच आहे ती म्हणजे सत्तेतील आश्वासनांना प्रत्यक्ष शासनात कसे उतरवायचे? पश्चिम बंगालमध्ये सुवेंदू अधिकारी यांचा उदय हा हिंदुत्वाच्या लाटेवर स्वार झालेल्या राजकारणाचा परिणाम मानला जात आहे. बंगालमध्ये स्वातंत्र्योत्तर काळात डाव्या विचारसरणीचा आणि प्रादेशिक अस्मितेचा प्रभाव अधिक राहिला. अशा राज्यात हिंदुत्ववादी राजकारणाला व्यापक स्वीकार मिळणे ही मोठी राजकीय घडामोड ठरते. विशेष म्हणजे, शपथविधीनंतर अधिकारी यांनी जय श्रीराम अशा संघर्षात्मक घोषणांना आवर घालण्याचे आवाहन केले. आता राजकीय भांडणाची वेळ नाही, असे त्यांनी स्पष्टपणे सांगितले. निवडणूक प्रचारात निर्माण झालेल्या कटुतेच्या पार्श्वभूमीवर हा संदेश महत्त्वाचा ठरतो. सुवेंदू अधिकारी यांनी रवींद्रनाथ टागोर यांच्या स्मृतीस्थळाला भेट देऊन बंगाली अस्मिता आणि सांस्कृतिक एकात्मतेलाही स्पर्श करण्याचा प्रयत्न केला. यामागे केवळ प्रतिकात्मकता नसून, बंगालच्या राजकारणाला संघर्षाऐवजी विकासाच्या दिशेने नेण्याचा संकेत दडलेला दिसतो. मात्र, प्रत्यक्षात हे साध्य करणे सोपे नाही. निवडणुकीनंतर बंगालचे राजकारण अधिक ध्रुवीकरणाकडे झुकले आहे, कारण त्या ठिकाणी मागच्या अनेक वर्षांपासून झालेला हिंदूवरील अत्याचार ते होय. अशा परिस्थितीत विचारधारेच्या राजकारणातून सर्वसमावेशक प्रशासन उभे करणे हे अधिकारी यांच्या समोरील सर्वात मोठे आव्हान असेल. दुसरीकडे, तामिळनाडूमध्ये अभिनेता ते राजकारणी असा प्रवास करणारे जोसेफ विजय हे पारंपरिक द्रविड राजकारणाच्या लोककल्याणवादी धोरणांना अधिक आक्रमक रूप देताना दिसतात. ते ख्रिश्चन असले तरी लोकांनी त्यांच्या आश्वासनाकडे बघून भरघोस मतं दिली. महिलांसाठी दरमहा २,५०० रुपयांची मदत, मोफत गॅस सिलिंडर, बेरोजगार पदवीधरांसाठी भत्ता, प्रशिक्षणार्थी युवकांना आर्थिक मदत, नवजात मुलींच्या मातांसाठी सहाय्य अशा अनेक आकर्षक योजना त्यांनी जाहीर केल्या आहेत. या घोषणा समाजातील महिलांमध्ये, बेरोजगार तरुणांमध्ये आणि निम्न मध्यमवर्गीय कुटुंबांमध्ये आशा निर्माण करणाऱ्या आहेत. यातील किती आश्वासनं ते पूर्ण करू शकतील हे काळच ठरवेल. परंतु, प्रश्न फक्त लोकप्रियतेचा नाही; प्रश्न आहे आर्थिक शाश्वततेचा. अशा मोठ्या प्रमाणातील कल्याणकारी योजनांसाठी प्रचंड आर्थिक संसाधने आवश्यक असतात. राज्याच्या तिजोरीवर त्याचा किती ताण येईल, महसूल कसा वाढवला जाईल आणि योजनांची अंमलबजावणी किती पारदर्शक व परिणामकारक असेल, याचे उत्तर देणे विजय यांच्यासाठी आवश्यक ठरेल. अन्यथा, लोकाभिमुख आश्वासने पुढे जाऊन आर्थिक संकटाचे कारण ठरू शकतात. बंगालमध्ये अधिकारी यांना विकास आणि सामाजिक समन्वय यांचा समतोल साधावा लागेल, तर तामिळनाडूमध्ये विजय यांना लोकप्रियतेपलीकडे जाऊन जबाबदार प्रशासनाची क्षमता सिद्ध करावी लागेल. लोकशाहीत सत्ता मिळवणे हे अंतिम यश नसते; ती केवळ सुरुवात असते. निवडणुकीतील उत्साह, घोषणांची चमक आणि व्यक्तिमत्त्वाचे आकर्षण काही काळ टिकू शकते; मात्र जनतेला शेवटी अपेक्षित असते ते परिणामकारक शासन. रस्ते, रोजगार, शिक्षण, आरोग्य, कायदा-सुव्यवस्था आणि आर्थिक स्थैर्य या मूलभूत प्रश्नांवर उत्तर देण्यातच कोणत्याही सरकारचे खरे यश दडलेले असते. आज देशातील मतदारही अधिक जागरूक झाले आहेत. ते फक्त भावनिक घोषणा किंवा करिष्माई नेतृत्वाकडे पाहात नाहीत, तर प्रत्यक्ष कामगिरीचे मूल्यमापन करतात. त्यामुळे सुवेंदू अधिकारी आणि विजय या दोन्ही नेत्यांसाठी पुढील काही वर्षे निर्णायक ठरणार आहेत. एकाला ध्रुवीकरणातून समन्वयाचा मार्ग शोधावा लागेल, तर दुसऱ्याला लोकानुनयातून आर्थिक जबाबदारीचा मार्ग स्वीकारावा लागेल. कारण कोणताही बदल टिकाऊ ठरतो तो केवळ घोषणांनी नव्हे, तर सुज्ञ प्रशासन, संतुलित धोरणे आणि जनतेच्या विश्वासाला न्याय देणाऱ्या कामगिरीमुळे. नव्या नेतृत्वासमोरचा हा खरा परीक्षेचा काळ आहे.

# दिल्लीत घुमतोय शंभूराजाचा जयघोष...

## (छत्रपती संभाजी महाराज जन्मोत्सवाचा राष्ट्रीय अस्मितेचा सोहळा)

दिल्ली... देशाची राजधानी... तसेच सत्तेचे केंद्र... आणि याच दिल्लीत गेल्या काही वर्षात घुमू लागला आहे. एक बुलंद जयघोष -छत्रपती संभाजी महाराज की जय..!हा केवळ जयघोष नाही,तर तो इतिहासाच्या पुनर्जागरणाचा आवाज आहे. विस्मृतीच्या धुक्यात हरवलेल्या स्वराज्यरक्षकाच्या तेजस्वी पराक्रमाला राष्ट्रीय व्यासपीठावर मिळालेली ही अभिमानाची मानवंदना आहे.'शंभू जन्मोत्सवाचा त्रैवार्षिक प्रवास' या प्रा.डॉ. प्रभाकर जाधव व प्रा.सतीश जाधव लिखित या ग्रंथातून उलगडणारी ही गाथा म्हणजे एका संस्कृती चळवळीचे प्रेरणादायी दस्ताऐवजी करणातून लेखाचा प्रपंच तयार केला आहे.

छत्रपती संभाजी महाराज हे केवळ छत्रपती शिवाजी महाराजांचे पुत्र नव्हते,तर ते स्वराज्याचे दुसरे छत्रपती. महान संस्कृत पंडित, पराक्रम युद्धे आणि अद्वितीय राष्ट्रनिष्ठेचे प्रतिक होते. औरंगजेबासारख्या बलाढ्य बादशहाला तब्बल नऊ वर्षे झुंजवत ठेवणारा हा राजा.इतिहासात अनेकदा दुर्लक्षित राहिला. पण मराठा मनातील शंभूराजांवरील प्रेम आणि अभिमान कधीच कमी झाला नाही.

याच भावनेतून १९९४ मध्ये 'छावा मराठा संघटना' स्थापन झाली आणि १४ मे १९९६ रोजी औरंगाबाद येथे प्रथमच सार्वजनिकरित्या छत्रपती संभाजी महाराज जयंती साजरी करण्यात आली. किशोरभाऊ चव्हाण, इंजि. तानाजी हुस्सेकर, प्रा. देविदास वडजे,प्राचार्य डॉ.कमलाकर कणसे, प्रा. डॉ. प्रभाकर जाधव यांच्यासह



अनेक कार्यकर्त्यांनी गावोगावी व्याख्याने, पोवाडे, प्रबोधन सभा घेत शंभूराजाचा खरा इतिहास समाजापर्यंत पोहोचण्याचा ध्यास घेतला. त्याचबरोबर वेरुळ येथे स्वराज्य संकल्पक शहाजीराजे भोसले यांचे स्मारकाचे काम पूर्णत्वास नेले.मराठा आरक्षणाच्या प्रश्नासह विविध प्रश्न सातत्याने छावा मराठा संघटनेच्या माध्यमातून शासन दरबारी मांडीत आले.

हा संघर्ष अखेर २०२३ मध्ये ऐतिहासिक टप्प्यावर पोहोचला. महाराष्ट्र शासनाने १४ मे हा दिवस अधिकृतपणे छत्रपती संभाजी महाराज जयंती म्हणून घोषित केला.या निर्णयामुळे अनेक दशकांच्या जनआंदोलनाला यश मिळाले.शाळा, महाविद्यालये आणि सरकारी कार्यालयांमध्ये अधिकृतरीत्या जयंती साजरी होऊ लागली. मात्र या प्रवासातील सर्वात अभिमानास्पद क्षण ठरला तो दिल्लीतील जन्मोत्सवाचा..!

१४ मे २०२३ रोजी दिल्लीतील महाराष्ट्र सदनात प्रथमच राष्ट्रीय स्तरावर छत्रपती संभाजी महाराज जयंती महोत्सव साजरा झाला. त्या दिवशी महाराष्ट्र सदन जणू एखाद्या गडकोटाचे रूप धारण करून उभे होते.हजारो दिपांनी उजळलेले सभागृह,जयघोषांनी दुमदुमलेले वातावरण आणि उपस्थित शिव - शंभू भक्तांच्या डोळ्यातील अभिमान- हा क्षण प्रत्येक मराठी माणसांसाठी अविस्मरणीय ठरला.

या महत्त्वाच्या आयोजनामागे किशोरभाऊ चव्हाण,इंजि. तानाजी हुस्सेकर, विलास पांगरकर,प्राचार्य डॉ.कमलाकर कणसे, प्रा. डॉ. प्रभाकर जाधव यांचेसह त्यांच्या सर्व सहकार्यांचे परिश्रम मोलाचे ठरले. तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनासह खासदार हेमंत पाटील यांच्या प्रयत्नांतून हा सोहळा साकार झाला.

या व्यासपीठावरून काही महत्त्वपूर्ण संकल्पनाही पुढे आल्या. त्यात 'मराठा टुरिझम' ही संकल्पना विशेष ठरली. मराठा साम्राज्याच्या पाऊलखुणा भारतभर विखुरलेल्या आहेत. अटकपासून तंजावरपर्यंत आणि कटक पासून दिल्लीपर्यंत मराठ्याचा इतिहास विस्तारलेला आहे.हा इतिहास नव्या पिढीपर्यंत पोहोचण्यासाठी ऐतिहासिक स्थळांचे संवर्धन, अभ्यास आणि पर्यटन यांची सांगड घालण्याचा अभिनव विचार या महोत्सवातून मांडण्यात आला.

२०२४ मध्ये लोकसभा निवडणुकीच्या आचारसंहितेच्या काळात ह्या उत्सव खंडित झाला नाही. सर्वोच्च न्यायालयातील ज्येष्ठ विधिज्ञ अँड. अमोल सूर्यवंशी यांच्या पुढाकारातून दिल्लीतील लोधी रोड परिसरात हा महोत्सव तितक्याच दिमाखात पार पडला. यामुळे हा सोहळा कोणत्याही राजकीय चौकटी पलीकडे जाऊन लोकसभागातून उभा राहिलेला संस्कृतिक उत्सव असल्याचे सिद्ध झाले.

आज दिल्लीतील हा जन्मोत्सव सोहळा केवळ एका राजाची जयंती राहिली नाही. तो मराठी अस्मितेचा,स्वाभिमानाचा आणि राष्ट्रीय एकात्मतेचा उत्सव बनला आहे. त्याच दिल्लीच्या तख्खाला शंभूराजांनी नऊ वर्षे झुंजवले,त्याच दिल्लीत आज त्यांच्या पराक्रमाचा गौरव केला जातो,हीच इतिहासाची खरी पुनर्स्थापना आहे.शंभूराजाचे जीवन आजच्या तरुणाईला केवळ शौर्याची नव्हे, तर विद्वतेची, राष्ट्रनिष्ठेची आणि स्वाभिमानाची प्रेरणा देते. तलवारी सोबतच लेखणीही तितक्याच समर्थपणे हाताळणारा हा राजा आज नव्या भारताच्या मनामनात पुन्हा जागा होत आहे.दिल्लीतून घुमणारा हा जयघोष केवळ महाराष्ट्राचा नसून संपूर्ण राष्ट्राच्या अभिमानाचा बनत चालला आहे. छ.संभाजीराजे भोसले यांच्या जन्मोत्सवाच्या निमित्ताने देशवाशीयांना मनापासून शुभेच्छा..! अभिमान राष्ट्राचा...जयघोष महाराष्ट्राचा..!

**-पंडित पवळे,**
नांदेड
मो.९८९०२३२९६२

# जगाला स्वाभिमानाची प्रेरणा देणारे महाप्रतापी धर्मवीर संभाजी महाराज



छत्रपती संभाजी महाराजांचा जन्म १४ मे इ. स. १६५७ रोजी पुरंदर येथे झाला आणि हिंदवी स्वराज्यात तेजस्वी तारा प्रगट झाला. राजपुत्र असल्यामुळे रणांगणातील मोहीम व राजकारणातील डावपेच यांचा संपूर्ण अभ्यास अवगत होता.त्याचप्रमाणे लहान -पणापासूनच ते अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचे मोठे धनी होते. संभाजींना लहानपणापासूनच अनेक कठीणायीचा सामना करावा लागला

संभाजी महाराज लहान असतानाच त्यांच्या आई महाराणी सईबाई यांचे निधन झाले आणि त्यांच्या काळजावर मोठा आघात झाला. या आघाता-पासून सावरण्यास राजमाता जिजाबाई यांनी आपले सर्वस्व पणाला लावले आणि हिंदवी स्वराज्याच्या निर्मितीसाठी व रक्षणासाठी शूरवीर संभाजी नावाचा महामेरू उभा केला. संभाजींची सावत्र आई पुतळाबाई यांनी आपल्या मुलासारखी वागणूक देवुन वटवृक्षाचे काम केले. परंतु त्यांची दुसरी सावत्र आई सोयराबाई यांनी संभाजीराजांच्या रस्त्यात बाभळीचे काटे रोवून पोरकेपणाची वागणूक दिली व महाराजांच्या राजकीय कारकीर्दीत ढवळाढवळ करण्याचा प्रयत्न केला.

संभाजींच्या मनात लहानपणापासूनच आपण स्वराज्यासाठी काहीतरी केले पाहिजे या उद्देशाने त्यांनी राजकारणातील संपूर्ण बारकावे आत्मसात केले. मुगलांच्या घडामोडी आणि राजकारण त्यांना लहान वयातच कळले. त्याचप्रमाणे संस्कृतसह इतर आठ भाषांचे ज्ञान त्यांना अवगत होते. याचा फायदा भविष्यात व्हावा या विचाराने शिवाजी महाराजांनी त्यांना आग्रा भेटीच्या वेळी बरोबर नेले. त्यावेळी संभाजीराजे फक्त ९ वर्षांचे होते.

छत्रपती शिवाजी महाराज औरंगजेबाच्या नजर कैदेतून निसटल्यानंतर त्यांना संभाजींची चिंता वाटू लागली. औरंगजेब आगबबुला झाला अशा वेळी संभाजीराजे स्वराज्यात सुखरूप पोहचावे या उद्देशाने शिवाजी महाराजांनी संभाजीराजांचे निधन झाल्याची अफवा पसरवून मोगलांच्या डोळ्यात धूळ झोकून संभाजींना महाराष्ट्र सुखरूप पोहचण्याचा मार्ग मोकळा केला. इ. स. १६७४ मध्ये शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला. शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाल्यानंतर अवघ्या १२ दिवसांतच राजमाता जिजाऊंचे निधन झाले आणि पुन्हा संभाजींना मोठा जब्बर धक्का बसला. त्यानंतर त्यांच्याकडे मायेने लक्ष देणारे कोणी राहिले नाही. कारण शिवाजी महाराज स्वराज्याच्या राजकारणात आणि रणांगणावर गुंतले होते. छत्रपती संभाजीं महाराजांनी आपल्या वडिलांप्रमाणेच सक्तीने धर्मांतर करणाऱ्या इंग्रज, पोर्तुगीज व मोगल सत्ताधाऱ्यांचा कडाडून विरोध केला. औरंगजेबाने इ.स. १६८२ साली मराठ्यांवर हल्ला केला.

औरंगजेब सैन्य, दारूगोळा, हत्ती-घोडे याबाबतीत बलशाली होता. कारण औरंगजेबाचे सैन्य संभाजी महाराजांच्या तुलनेत ५ पटीने अधिक होते. त्याकाळी जगातील सर्वात शक्तिशाली सैन्यामध्ये औरंगजेबाचा समावेश होता. तरीही संभाजी महाराजांच्या नेतृत्वाखाली मराठ्यांनी हिमतीने लढा दिला. त्याचप्रमाणे संभाजी महाराजांनी गोव्याचे पोर्तुगीज, जंजिऱ्याच्या सिद्धी आणि म्हैसूरचा चिक्कदेवराय या शत्रूंना जोरदार धडा शिकवला. त्यामुळे संभाजी महाराजांच्या विरूद्ध औरंगजेबाला मदत करायची हिंमत कोणाचीही झाली नाही. कारण त्याकाळी संभाजी म्हणजे एक वादळी तुफान होते. त्यामुळेच संभाजी महाराजांच्या नेतृत्वाखालील मराठ्यांनी मोठ्या शिताफीने झुंज दिली. इ. स. १६८९ च्या सुरूवातीला संभाजी महाराजांनी त्यांच्या महत्वाच्या सरदारांना बैठकीसाठी कोकणातील संगमेश्वर येथे बोलावले.

१ फेब्रुवारी इ. स. १६८९ रोजी संभाजी महाराज रायगडाकडे रवाना होत असतानाच औरंगजेबाचा सरदार मुकर्रबखान याने नागोजी माने यांच्या साथीने संगमेश्वरावर हल्ला केला. मराठ्यात आणि शत्रूंच्या सैन्यात मोठी चकमक झाली. मराठ्यांचे संख्याबळ कमी असल्याने शत्रूंचा हल्ला परतवून लावू शकले नाही. त्यामुळे शत्रूने संभाजी महाराजांना व त्यांच्या सोबत असलेल्या कवी कलश यांना जिवंत पकडले. अशाही परिस्थितीत महाराजांना वाचविण्याचा प्रयत्न मराठ्यांनी केला. परंतु ते त्यात यशस्वी झाले नाहीत. पहिला प्रयत्न जोत्याजी केसरकर यांनी केला. यानंतर अप्पा शास्त्री यांनी देखील केला. परंतु दोन्ही प्रयत्न अयशस्वी ठरले व संभाजी महाराज औरंगजेबाच्या तावडीत सापडले. औरंगजेबाच्या तावडीत सापडल्यानंतर औरंगजेबाने महाराजांना इस्लाम धर्म स्वीकारण्याची जबरदस्ती केली. परंतु त्यांनी आपल्या धर्माचे पालन करत इस्लाम धर्म स्वीकारण्यास नकार दिला. त्याचप्रमाणे राज्याचा संपूर्ण खजाना आमच्या स्वाधीन करावा अशी अट घातली तेही संभाजी महाराजांनी मान्य केली नाही. संभाजी राजांचा धीटपणा आणि स्वराज्याच्या प्रती प्रेम पाहून औरंगजेब हतबल झाला आणि तेव्हापासून संभाजी महाराजांना यातना देण्यास सुरुवात केली. तरीही औरंगजेबाची कोणतीही अट माणन्यास व त्यांच्या सामोरं यत्किंचितही झुकण्यास महाराज तयार नव्हते.

संभाजी महाराजांनी औरंगजेबाला खडसावून सांगितले की, स्वराज्याच्या रक्षणासाठी व प्रजेच्या हितासाठी कोणतीही तडजोड करणार नाही यासाठी माझे प्राण गेले तरी चालेल अशी सिंह गर्जना ऐकताच औरंगजेबाने संभाजी महाराजांना कठोर यातना देण्यास सुरुवात केली. औरंगजेबाने महाराजांचे डोळे काढले. महाराजांची जीभ कापली, महाराजांवर अतोनात वार करण्यात आले. हे सगळं संभाजी महाराज ४० दिवस सहन करीत होते. तरीही मराठा साम्राज्यासाठी लढत राहिले. एवढ्या छळाने सुध्दा औरंगजेबाचा आत्मा शांत झाला नाही. शेवटी औरंगजेबाने आपली संपूर्ण क्रुरतेची हद्द पार केली व ११ मार्च १६८९ रोजी महाराजांचे हात-पाय, आणि त्यांचे सर्व देह शरीरापासून वेगळे करून त्यांची क्रुरतेने हत्या करण्यात आली.

शेवटी औरंगजेब हताश होऊन म्हणतो की, 'माझ्या पोटी असा शूरवीर, धाडसी पुत्र जन्माला का आला नाही? याची खंत त्याला मरेपर्यंत सतावत होती. शत्रूला हेवा वाटेल असे महान कार्य संभाजी महाराजांनी केले व जगाच्या इतिहासात कमी वयात म्हणजे ३२ व्या वर्षी स्वराज्याच्या व प्रजेच्या रक्षणासाठी बलिदान देणारा राजा म्हणून संभाजी महाराजांसमोर आज सर्वच नतमस्तक होतात.

संभाजी महाराजांना बलिदान दिना निमित्त कोटी कोटी प्रणाम. महाराष्ट्र हा शूर- वीरांचा व धर्मवीरांचा आहे. याची जाण आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी लक्षात ठेवली पाहिजे. त्यामुळे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या बलिदान दिनाचे औचित्य साधून राज्यातील भ्रष्टाचार, महागाई, शेतकऱ्यांच्या समस्या, बेरोजगारी, आरोग्य, शिक्षण इत्यादी समस्याकडे जातीने लक्ष देण्याची गरज आहे. यामुळे जनतेला (प्रजेला) सुख-समाधान प्राप्त होईल. कारण आज आपण जो मोकळा श्वास घेतो व हसतो-बागडतो आहोत तो छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुण्यायीमुळेच, ही बाब आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी लक्षात ठेवली पाहिजे.

महाराष्ट्र ही संतांची, शुर-वीरांची, थोर महात्म्यांची व क्रांतिकारकांची पावणभूमी आहे. याची जोपासना आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी करणे अत्यंत गरजेचे आहे. धर्मवीरांनी महाराष्ट्र घडविण्यासाठी बलिदान दिले. परंतु आजचा राजकीय पुढारी गरीब, सर्वसामान्य, शेतकरी यांचे रक्त भ्रष्टाचाराच्या माध्यमातून पीत आहे. याची खंत धर्मवीर संभाजी महाराज, साधुसंत, थोर पुरुष, क्रांतिकारक व आपले पूर्वज यांना अवश्य होत असेल. त्यामुळे कोणत्याही महापुरुषांचे बनिदान व्यर्थ जाणार नाही याची काळजी आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी घेतली पाहिजे व संभाजी महाराजांचा आदर्श समोर ठेवून पुढील वाटचाल व्हायला हवी. यातच आपल्याला धर्मवीर संभाजी महाराज दिसून येईल. आज बदलत्या हवामानामुळे प्रदूषणाच्या विळख्यात संपूर्ण पृथ्वी आहे. तिला वाचविण्यासाठी धर्मवीर संभाजी महाराज यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून युद्धपातळीवर मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण व्हायला हवे. कारण आज लावलेले वृक्ष शेकडो काळ टिकेल. याच वृक्षांच्या पानांत, फुलात, फळात व जळामुळात संपूर्ण थोर महात्म्याचे व शूर-वीरांचे दर्शन अवश्य होईल. त्याचप्रमाणे महाराष्ट्रातील संपूर्ण गडकिल्ले सुसज्जित करून पर्यटनासाठी मोकळी करावीत. कारण गडकिल्ले महाराष्ट्राची आण-बाण-शान आहे. त्यामुळे त्यांची जपणूक केलीच पाहिजे. यामुळे नवीन पिढीला संपूर्ण गडकिल्ल्यांचा इतिहास समजण्यास सुलभ जाईल आणि शिवाजी महाराज व संभाजी महाराज यांचा इतिहास सहज समजूत येईल. कारण याच गडकिल्ल्यात महाराष्ट्राची संपूर्ण खरी संस्कृती दडलेली आहे. छत्रपती संभाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त कोटी कोटी प्रणाम व मानाचा मुजरा.

**-रमेश लांजेवार**
नागपूर
मो. ९९२१६९०७७९

# विद्यार्थ्यांच्या भविष्याशी आणि मानसिकतेशी खेळ

वैद्यकीय पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी घेतली जाणारी संयुक्त प्रवेश परीक्षा (नीट युजिसी) रद्द करण्यात आल्याचा निर्णय राष्ट्रीय परीक्षा प्राधिकरणाने (एनटीए) मंगळवारी जाहीर केला. ३ मे रोजी घेण्यात आलेल्या नीट प्रवेश परीक्षेचा पेपर फुटल्याने ही परीक्षा रद्द करून पुन्हा घेण्याचा निर्णय राष्ट्रीय परीक्षा प्राधिकरणाने घेतला आहे. तीन मे रोजी झालेल्या या परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेतील तब्बल १२० प्रश्न हे परीक्षेच्या पंधरा दिवसांपूर्वी अंदाज म्हणून वर्तविण्यात आलेल्या प्रश्नसंचिकेतील असल्याचे निदर्शनास आल्या नंतर राष्ट्रीय परीक्षा प्राधिकरणाने हा निर्णय घेतला. एकाच प्रश्नसंचिकेतील १२० प्रश्न जसेच्या तसे नीटच्या परीक्षेत येणे ही पेपर फुटीच आहे.

नीट सारख्या महत्त्वाच्या आणि राष्ट्रीय स्तरावर घेतल्या जाणाऱ्या प्रवेश परीक्षेचा पेपर अशा पद्धतीने फुटणे ही जितकी धक्कादायक बाब आहे तितकीच ती चिंतनीयही आहे. ही परीक्षा रद्द झाल्याने अंदाजे दहा लाख विद्यार्थ्यांना पुन्हा परीक्षा द्यावी लागणार आहे. गेली दोन वर्ष रात्रीचा दिवस करून परीक्षा देणाऱ्या प्रामाणिक विद्यार्थ्यांना या निर्णयाचा मोठा फटका बसणार आहे. भ्रष्ट व्यवस्था आणि काही लोकांनी केलेल्या चुकीची शिक्षा लाखो




गुणी आणि मेहनती विद्यार्थ्यांना मिळणार आहे काहीही चूक नसताना या विद्यार्थ्यांना याचा मनस्ताप सहन करावा लागत असल्याने विद्यार्थ्यांमध्ये नाराजीची भावना पसरली आहे. अनेक विद्यार्थ्यांनी कठीण आर्थिक आणि मानसिक परिस्थितीतून नीटच्या परीक्षेची तयारी केली होती. परीक्षा चांगली गेल्याने चांगल्या महाविद्यालयात प्रवेश मिळेल या आशेवर असणाऱ्या विद्यार्थ्यांवर याचा मोठा मानसिक ताण येणार आहे.

खेडेगावातून शहरात आलेल्या विद्यार्थ्यांना आता आणखी आर्थिक झळ सोसावी लागणार आहे. त्यांना पुन्हा शहरात जाऊन राहणे, वसतिगृहाचा खर्च करणे, क्लासेस, टेस्ट सिरिज जॉइन करणे यासाठी अतिरिक्त आर्थिक भार सहन करावा लागणार आहे त्यामुळे विद्यार्थीच नाही तर पालकही चिंतेत आहे. दोन वर्षाची मेहनत सफल झाली असे वाटत असतानाच पुन्हा परीक्षा देण्याची वेळ आल्याने विद्यार्थ्यांवर मानसिक तणाव आला आहे. वारंवार पेपर फुटीच्या घटना घडत असतील तर प्रामाणिकपणे अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांनी कोणत्या विश्वासाने परीक्षेची तयारी करावी ? ही केवळ परीक्षा व्यवस्थेची चूक नसून विद्यार्थ्यांच्या भविष्याशी आणि मानसिकतेशी केलेला खेळ आहे. अशा घटनांमुळे विद्यार्थ्यांचे भविष्य अंधकारमय होण्याची भीती निर्माण झाली आहे. यापुढे तरी पेपर फुटी होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे.

राष्ट्रीय परीक्षा प्राधिकरणाची स्थापना करताना विद्यार्थ्यांची सोय, गुणवत्ता आणि पारदर्शीपणा हे मुद्दे अधोरेखित करण्यात आले होते. परंतु प्रत्यक्षात गेल्या पाच वर्षात तीन वेळा नीटचा पेपर फुटल्याचे समोर आले आहे. २०२४ सालीही नीट परीक्षेचा पेपर फुटला होता. तेंव्हा नीटचा पेपर वीस ते चाळीस लाखांना विकला गेल्याचे समोर आले होते त्यामुळे घोषित केलेला निकाल बदलण्याची नामुष्की राष्ट्रीय परीक्षा प्राधिकरणावर आली होती. त्यानंतर राष्ट्रीय परीक्षा प्राधिकरणाने नीटची परीक्षा सुरक्षित करण्यासाठीच्या उपाययोजना करणे आवश्यक होते. मात्र तसे झालेले नाही हे यंदाच्या प्रकरणावरून दिसून येते. नीट परीक्षेत पेपर फुटू नये यासाठी कायमस्वरुपी उपाययोजना गरजेच्या आहेत.

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या आवाहनाला नांदेडमध्ये प्रतिसाद; अनेकांनी घेतली शपथ




**नांदेड (प्रतिनिधी)** –अमरनाथ यात्री संघाच्या वतीने बुधवारी सकाळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत धर्मभूषण ॲड. दिलीप ठाकूर यांच्या नेतृत्त्वाखाली इंधन बचत, स्वदेशीचा वापर, अनावश्यक खर्च टाळणे तसेच देशहित जपण्याची सामूहिक शपथ घेण्यात आली.

अमरनाथ यात्रा अत्यंत अवघड व खडतर असल्याने यात्रेकरूंना शारीरिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी गेल्या २६ वर्षांपासून सलग तीन महिने दररोज सकाळी नियमित वॉकिंग, ओपन जिममधील व्यायाम तसेच प्राणायाम घेतला जात आहे. शरीरासोबत मनही प्रसन्न राहावे यासाठी दररोज विनोद सांगण्याचाही उपक्रम राबविला जात असून, त्यामुळे वातावरणात उत्साह व सकारात्मकता निर्माण होत आहे. यावर्षी यात्रेकरूंची संख्या वाढल्यामुळे ३ व १७ जुलै रोजी दोन वेगवेगळे जत्थे अमरनाथ यात्रेसाठी रवाना होणार आहेत. संपूर्ण भारतात फक्त नांदेड येथेच यात्रेकरूंची अशा प्रकारे पूर्वतयारी केली जाते, असे आयोजकांनी सांगितले.

बुधवारी सकाळी झालेल्या कार्यक्रमात सुभाष देवकत्ते यांनी चालण्याचे महत्त्व विशद केले. संजय चौधरी यांनी ऑनलाईन बुकिंगविषयी माहिती दिली. छाया चौधरी यांनी भजन सादर केले, तर साईप्रसाद हळदे यांनी ओपन जिमचे फायदे समजावून सांगितले. प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित असलेल्या राजश्री हुरणे यांचा सत्कार जयश्री ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी दिलीप ठाकूर यांनी उपस्थितांकडून सामूहिक शपथ वदवून घेतली. प्रसंगी मंदाकिनी सुरनर, गौरी व साईप्रसाद देवकत्ते, शर्मिला व प्रशांत होट्टे, वंदना व हनुमानसिंह चौहान, सुचित्रा व प्रल्हादराव नवघरे, कैलाश महाराज वैष्णव, संगीता व प्रशांत जोशी, अन्नपूर्णा व श्यामराव खराणे, सलोना व विजयसिंह चव्हाण, छायाबाई व अशोक दालपे, शोभा व नारायण चव्हाण, राधा व किशन चव्हाण, श्रीकांत अकोलकर, नंदा व भारत चव्हाण, गंगामणी व बजरंग खंदारे, भाग्यश्री व नामदेव पांचाळ, मीरा व जयप्रकाश येवले, मीना व विश्वनाथ झुंजारे तसेच मेधा व रणजीत धर्मापुरीकर यांनी देश प्रथम ही भावना जपत राष्ट्रहितासाठी सदैव कार्यरत राहण्याची ग्वाही दिली.

यात्रेकरूंमध्ये मोठा उत्साह दिसून येत असून निरोगी शरीर, सकारात्मक मन आणि राष्ट्रभक्तीची भावना या त्रिसूत्रीवर विशेष भर दिला जात आहे.

# जैविक निविष्ठा निर्मिती महिला प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न




**नांदेड (प्रतिनिधी)**– कृषी विज्ञान केंद्र पोखर्णी नांदेड व मोहीम यांच्या संयुक्त विद्यमाने मौजे सुगाव बुद्रुक ता. नांदेड येथे दि. १२ मे रोजी महिला बचत गटांसाठी जैविक निविष्ठा निर्मिती प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाचे उद्घाटन कृषी विज्ञान केंद्राचे पीक संरक्षण तज्ज्ञ प्रा. माणिक कल्याणकर व महिला विकास महामंडळाचे विभागीय सल्लागार संदीप मराठे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सर्वप्रथम क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

कृषी विज्ञान केंद्र पोखर्णी नांदेडकडून जैविक निविष्ठा प्रशिक्षण कार्यक्रम माध्यमातून महिलांना जीवामृत व दशपर्णी अर्क बनवण्याचे प्रात्यक्षिक देण्यात आले. शेतीचा उत्पादन खर्च कमी करणे, जमिनीचे आरोग्य सुधारणे आणि विषमुक्त अन्नाचे उत्पादन घेणे आदींविषयी प्रशिक्षण देण्यात आले. तसेच स्वतःच्या शेतात उपलब्ध साहित्यापासून तयार जैविक खतांमुळे जमिनीतील सूक्ष्मजीवांची संख्या वाढते आणि सेंद्रिय पदार्थांचे विघटन जलद होते याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

तसेच जैविक खतांच्या वापरामुळे धान्य, फुले आणि फळांचे भरघोस आणि दर्जेदार उत्पादन मिळते. सूक्ष्मजीव आणि गांडुळांसारख्या सजीवांना जिवंत ठेवून मातीचे आरोग्य सुधारते, असे प्रा. माणिक कल्याणकर यांनी मार्गदर्शन करताना सांगितले. यानंतर जीवामृत व दशपर्णी अर्क निर्मितीचे प्रात्यक्षिक प्रशिक्षणार्थींना करून दाखवण्यात आले.

यावेळी कृषी विस्तारतज्ज्ञ डॉ. अमिता क्षत्रिय यांनी नैसर्गिक शेतीचा प्रसार व शासकीय योजनांचा लाभ घेण्याबाबत मार्गदर्शन केले. गृहविज्ञान तज्ज्ञ प्रा. सौ. अलका पवळे यांनी महिलांना आरोग्यासाठी विषमुक्त अन्नाचे आहारातील महत्त्व व त्यासाठी परसबागेची लागवड याविषयी सखोल मार्गदर्शन केले. सेंद्रिय शेतीचे आहारातील महत्त्व याबाबत अलका पवळे यांनी सांगितले.

हवामान बदल व मुसळधार पावसामुळे जमिनीचा वरचा सुपीक थर वाहून जातो, तर अति उष्णतेमुळे मातीतील सेंद्रिय कर्ब कमी होतो, यामुळे जमिनीचा पोत खराब होतो. हवामान बदल हा शेतीसाठी सध्या सर्वात मोठा धोका बनला आहे. तापमानातील अनपेक्षित वाढ, पावसाचे बदलते चक्र आणि नैसर्गिक आपत्तींमुळे शेतीचे प्रचंड नुकसान होत आहे, असे विभागीय सल्लागार संदीप मराठे यांनी सांगितले.

यावेळी जिल्हा समन्वय अधिकारी अनंत क्षेत्र यांची प्रमुख उपस्थिती होती. सूत्रसंचालन मॅनेजर राहुल शिंदे यांनी केले. सहयोगिनी शर्मिला वाढवे, रमा वैद्य, स्वाती भारसावडे, शेतकरी कल्याण गुब्रे, खोब्राजी हिंगमिरे, विजय भारसावडे व सुगावमधील शेतकरी आणि महिला बचत गट उपस्थित होता.

# सव्वा लाखांची अवैध दारू जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)**– येथील नांदेड ग्रामीण पोलिसांनी विदेशी दारूची अवैध विक्री करणाऱ्या दोघांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून १ लाख १९ हजार ३५० रुपयांचा अवैध दारूचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी केली.

नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी पोलीस शिपाई मारोती पंचलिंग यांनी फिर्याद दिली होती. पोलिसांनी ही कारवाई दि. १२ मे रोजी दुपारी १ वाजताच्या सुमारास कृषी उद्योग गेटजवळ, चंदासिंग कॉर्नरकडे जाणाऱ्या रस्त्यावर केली होती.

# टॅब २.० चे केवळ 'गाजर' नको, थकीत बिलांची रक्कम त्वरित खात्यात जमा करा –शिक्षक सेनेची मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)**– टॅब २.० च्या थकित बिलाची रक्कम त्वरित खात्यात जमा करा, लाभधारकांची दिशाभूल नको, अशी मागणी शिक्षक सेनेच्यावतीने करण्यात आली आहे.

वरिष्ठांना दिलल्या निवेदनात म्हटले आहे की, प्रशासनाला आमचे रोखठोक सवाल असे आहेत की, दिरंगाई कोणासाठी? आर्थिक वर्ष २०२५–२६ मध्ये ऑनलाईन–ऑफलाईन पडताळणी झाली, एकही त्रुटी नसताना बिले का रखडली?आर्थिक कोंडीचा खेळ सुरु झाला असून जिल्हा परिषद शिक्षण आणि वित्त विभागाने बिलांचे 'टप्पे' का पाडले? यामागे कोणाचे हितसंबंध होते? गुरुजींना नाहक त्रास देऊन वारंवार पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेचे उंबरठे झिजवूनही पैसे मिळाले नाहीत, याला जबाबदार कोण? असा सवालही शिक्षक सेनेच्यावतीने करण्यात आला आहे.

कागदपत्रांचा फेरफार बंद करा. शिक्षकांना पुन्हा ऑनलाईन अर्ज किंवा कागदपत्रे मागवून वेठीस न धरता जी बिले आधीच मंजूर झाली आहेत, ती येत्या ४ ते ५ दिवसांत शिक्षकांच्या खात्यात जमा करा.

आमचा कोणताही शिक्षक बांधव पुन्हा ऑनलाईन बील दाखल करणार नाही. जे रेकॉर्ड तुमच्याकडे आहे, त्याचा वापर करून तत्काळ पेमेंट करा. शिक्षण विभागाने पत्रांचा खेळ थांबवून गुरुजींच्या संयमाची परीक्षा पाहू नये अन्यथा महाराष्ट्र राज्य शिक्षक सेना आपल्या न्याय हक्कासाठी वरिष्ठ पातळीवर तीव्र लढा पुकारेल, असा इशाराही महाराष्ट्र राज्य शिक्षक सेनेच्यावतीने देण्यात आला आहे.

वरिष्ठांना निवेदन देताना शिक्षक सेनेचे राज्य उपाध्यक्ष विठ्ठल चव्हाण, जिल्हाध्यक्ष संतोष अंबुलगेकर, सरचिटणीस रवी बंडेवार, कोषाध्यक्ष गंगाधर कदम व समस्त जिल्हा पदाधिकारी व सदस्य यांच्यासह प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते, असे आंबुलगेकर यांनी सांगितले.

# 'यशवंत' भारत एन्व्हॉर्मेंट प्रोग्रामद्वारे राष्ट्रस्तरीय प्लॅटिनम गोल्ड पारितोषिकाने सन्मानित



**नांदेड (प्रतिनिधी)**– यशवंत महाविद्यालयाने राष्ट्रीय स्तरावरील भारत एन्व्हॉर्मेंट प्रोग्राम, भारत सस्टेनेबल कॅम्पस मिशन–२०२६ अंतर्गत पर्यावरण संवर्धन, झिरो प्लास्टिक, ग्रीन कॅम्पस मिशनमध्ये माजी प्र–कुलगुरू प्राचार्य डॉ. गणेशचंद्र एन. शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार एकूण आठ उपक्रमात रिसर्च हाइट्स फाउंडेशनच्या सहकार्याने १६८ विद्यार्थ्यांनी उत्साहपूर्ण आणि यशस्वी कृतिशील उपक्रमांनी सहभाग नोंदविला. या उपक्रमात भारतातील जवळपास प्रत्येक घटक राज्यातील उच्च शिक्षण संस्थांनी सहभाग घेतला.

हरित कॅम्पस हे केवळ शिक्षणाचे स्थान नसून ज्ञान आणि निसर्ग यांच्यातील सुसंवादाचे जिवंत उदाहरण असल्याचे ध्येय केंद्रबिंदू मानून डॉ. एल. व्ही.पद्मारानी राव यांच्या समन्वयाद्वारे संपन्न झाले. यामध्ये यशवंत महाविद्यालय ते भाग्यनगर समुदाय जनजागरण रॅली आणि भाग्यनगर परिसरात विद्यार्थ्यांनी पथनाट्याद्वारे पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. बाबानगर परिसरात झिरो प्लास्टिक ड्राईव्ह अंतर्गत शासकीय रुग्णालयात स्वच्छता अभियान राबवण्यात आले. कॅम्पस ग्रीन ॲक्शनअंतर्गत बोटॅनिकल गार्डनमध्ये वृक्षारोपणाबरोबरच कचरा व्यवस्थापन आणि जल पुनर्वापरावर मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांचे पोस्टर सादरीकरण, महाविद्यालयाचे ग्रीन ऑडिट, सस्टेनेबल आयडिया अँड सोल्युशन सत्रामध्ये विद्यार्थ्यांच्या नावीन्यपूर्ण कल्पना नोंदविण्यात आल्या.

या राष्ट्रीय स्तरावरील कृतिशील व नाविन्यपूर्ण उपक्रमा–बद्दल यशवंत महाविद्यालयास प्लॅटिनम गोल्ड सस्टेनेबल कॅम्पस पारितोषिकाने सन्मानपूर्वक गौरविण्यात आले आहे. दि. १ जून २०२६ रोजी ग्लोबल पीस ऑडिटोरियम, हैदराबाद येथे या गौरवशाली पारितोषिकाचे वितरण संपन्न होणार आहे. त्याकरिता महाविद्यालयाचे प्राचार्य, चार प्राध्यापक आणि दहा विद्यार्थ्यांना विशेष निमंत्रण देण्यात आलेले आहे.

'यशवंत' च्या शिरपेचात राष्ट्रस्तरीय पारितोषिकाच्या मानाने तुरा खोवल्याबद्दल महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री व संस्थेचे अध्यक्ष खा. अशोकराव चव्हाण, उपाध्यक्ष माजी आमदार सौ. अमितताई चव्हाण, सचिव माजी पालकमंत्री डी. पी. सावंत, सहसचिव डॉ. रावसाहेब शेंदारकर, कोषाध्यक्ष अँड. उदयराव निंबाळकर, कार्यकारिणी सदस्य अँड. आ. कु. श्रीजयाताई चव्हाण, भाऊराव चव्हाण सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष नरेंद्र चव्हाण, पांडुरंगराव पावडे यांनी अभिनंदन केले आहे.

# सीआरपीएफमध्ये किशोर शिंदे व पोलीस दलात साईनाथ कदम यांची निवड झाल्याबद्दल सत्कार



**अर्धापूर (प्रतिनिधी)**– किशोर शिंदे यांची सीआरपीएफ १३ (वडसा) गडचिरोली व साईनाथ कदम यांची नागपूर शहर पोलीस म्हणून निवड झाल्याबद्दल सोयेश अर्कडमीच्या वतीने सत्कार करण्यात आला.

यावेळी नगराध्यक्ष प्रतिनिधी प्रवीण देशमुख, माजी नगराध्यक्ष छत्रपती कानोडे, माजी नगराध्यक्ष प्रतिनिधी उमाकांत सरोदे, व्यंकटी राऊत, क्रीडा शिक्षक शिंदे, गुरुराज रणखांब, पुरभाजी कानोडे, मनोज कदम, सोमेश अर्कडमीचे संचालक सोमेश कानोडे आदीसह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

# शासकीय आदिवासी वसतिगृहात विद्यार्थ्यांना प्रवेशाची संधी

## पंडित दिनदयाळ उपाध्याय स्वयंम योजनेतूनही प्रवेश

**नांदेड (प्रतिनिधी)**– अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी किनवट प्रकल्पाअंतर्गत मुलींचे ६ व मुलांचे ९ असे एकूण १५ शासकीय वसतिगृह कार्यरत आहेत. २०२६–२७ या शैक्षणिक सत्रासाठी आदिवासी मुला–मुलींच्या शासकीय वसतिगृहात प्रवेशासाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात आले आहेत, असे सहायक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प किनवट यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

किनवट प्रकल्पातील जिल्हास्तर वसतिगृहामध्ये कनिष्ठ महाविद्यालयीन, पदवी, पदव्यूत्तर, डिप्लोमा व व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी आणि तालुकास्तर वसतिगृहामध्ये इयत्ता ८ वी ते कनिष्ठ महाविद्यालयीन, पदवी, पदव्यूत्तर, डिप्लोमा व व्यावसायिक अभ्यासक्रमा–करिता विद्यार्थ्यांनी निकाल जाहीर झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसाच्या आत ऑनलाईन परिपूर्ण कागदपत्रासह http://swayam.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर अर्ज करावेत.

प्रवेशाची प्रक्रिया गुणवत्ता तथा शासन नियमानुसार करण्यात येईल. वसतिगृहात रिक्त जागेच्या अधीन राहुनच प्रवेश देण्यात येईल. ज्या विद्यार्थ्याचा वसतिगृहात प्रवेश होणार नाही अशा विद्यार्थ्यांचा ऑनलाईन अर्ज पंडित दिनदयाळ उपाध्याय स्वयंम योजनेत वसतिगृह प्रवेश संपल्यावर वळती करण्यात येणार आहे. परंतु त्याकरिता विद्यार्थ्यांनी ऑनलाईन वसतिगृहाचा अर्ज करतानाच पंडित दिनदयाळ उपाध्याय स्वयंम योजना (चेक बॉक्स क्लिक करून) निवड करणे अनिवार्य आहे.

विद्यार्थ्यांनी वसतिगृह प्रवेशाकरिता मुदतीत आवश्यक कागदपत्रे अपलोड करुन ऑनलाईन अर्ज भरण्यात यावा. विद्यार्थ्याचे आधार प्रमाणिकरण असणे आवश्यक आहे. विद्यार्थ्याचे आधार नंबर व बँक खाते नंबरचे सिंडिंग असणे आवश्यक आहे. ज्या विद्यार्थ्याचे आधार सिंडिंग नसल्यास त्या विद्यार्थ्यांनी संबंधित बँकेशी संपर्क करुन आधार सिंडिंग करुन घेणे आवश्यक आहे. तरच डीबीटीचा लाभ मिळेल अन्यथा डीबीटीचा लाभ मिळणार नाही, असे आवाहन करण्यात आले आहे.

# वृत्तपत्र विक्रेता कल्याणकारी महामंडळ तातडीने कार्यान्वित करण्याची मागणी



**नांदेड (प्रतिनिधी)**– वृत्तपत्र विक्रेता कल्याणकारी महामंडळ तातडीने कार्यान्वित करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत राज्याचे मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री व कामगार मंत्री यांना नांदेड जिल्हा वृत्तपत्र वितरक विकास मंडळाच्या वतीने निवेदन देण्यात आले आहे.

या निवेनात म्हटले आहे की, वृत्तपत्र विक्रेता कल्याणकारी महामंडळाची घोषणा झाली घोषणा झाली, आता अंमलबजावणी करा, या प्रमुख मागणीसाठी राज्यभर महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटनेच्या निर्देशानुसार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, दोन्ही उपमुख्यमंत्री व कामगार मंत्री यांना तालुका व जिल्हा स्तरावर निवेदने देवून शासनाचे लक्ष वेधण्यासाठी आंदोलन सुरू आहे. याचाच भाग म्हणून नांदेड जिल्हा वृत्तपत्र वितरक विकास मंडळाच्या वतीने ऊन–पावसाची तमा न बाळगता घराघरांत ज्ञान पोहोचवणाऱ्या या कष्टकरी बांधवांसाठी सरकारने जाहीर केलेले 'वृत्तपत्र विक्रेता कल्याणकारी महामंडळ' अद्याप कागदावरच आहे. ते तातडीने कार्यान्वित करावे या मागणीचे निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर यांना देण्यात आले.

महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे कार्याध्यक्ष बालाजी पवार यांच्या नेतृत्वाखाली नांदेड जिल्हा वृत्तपत्र वितरक विकास मंडळाच्या वतीने राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, दोन्ही उपमुख्यमंत्री आणि कामगार मंत्री यांच्या नावे असलेले निवेदन सादर करण्यात आले.

या आंदोलनात आणि निवेदन देताना महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे कार्याध्यक्ष बालाजी पवार, नांदेड जिल्हा वृत्तपत्र वितरक विकास मंडळाचे अध्यक्ष चंद्रकांत घाटोळ, उपाध्यक्ष सतीश कदम, सचिव गणेश वडगावकर, कोषाध्यक्ष बाबू जल्देवार, दिपक तिडके यांच्यासह जिल्ह्यातील मोठ्या संख्येने वृत्तपत्र विक्रेता सदस्य उपस्थित होते.

# भोकर ग्रामीण रुग्णालयात 'जागतिक परिचारिका दिन' साजरा




**भोकर (प्रतिनिधी)**– आधुनिक नर्सिंगचा पाया रचणाऱ्या जगप्रसिद्ध परिचारिका फ्लोरेन्स नाईटिंगेल यांचा जन्म दिवस 'जागतिक परिचारिका दिन' म्हणून संपूर्ण जगभरात साजरा केला जातो. याच दिनाचे औचित्य साधून १२ मे रोजी भोकर येथील ग्रामीण रुग्णालयात जागतिक परिचारिका दिन मोठ्या उत्साहात आणि आरोग्यसेवेच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करीत साजरा करण्यात आला.

हा कार्यक्रम जिल्हा शल्य चिकित्सक (नांदेड) डॉ. संजय पेरके, निवासी वैद्यकीय अधिकारी (बाह्य) डॉ. राजाभाऊ बुट्टे आणि वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रताप चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला फ्लोरेन्स नाईटिंगेल यांच्या प्रतिमेस ग्रामीण रुग्णालय भोकर येथील इन्चार्ज सिस्टर श्रीमती उज्ज्वला पवार व सर्व अधिपरीचारिकांनी पुष्पहार अर्पण केला. यावेळी मेणबत्ती प्रज्वलित करून त्यांच्या कार्याला मानवंदना देण्यात आली.

रुग्णसेवेप्रती निष्ठा आणि सेवाभाव जपण्यासाठी आरोग्य सेविका श्रीमती मुक्ता गुट्टे यांनी उपस्थित सर्वांना प्रतिज्ञा दिली. सर्व परिचारिकांनी निष्ठेने रुग्णसेवा करण्याची सामूहिक शपथ यावेळी घेतली.

या प्रसंगी डॉ. विजयलक्ष्मी किनीकर, अधिपरिचारिका श्रीमती साधना भगत, संगीता ताटेवाड, संगिता महादळे, दीक्षा पाटील, संगीता भालेराव, प्रियंका बगळे, श्रीमती माटोरे, श्रीमती डवरे, श्रीमती भालेराव, आरोग्य सेविका संगीता पंदीलवाड, सरस्वती दिवटे यांच्यासह ग्रामीण रुग्णालय भोकर येथील सर्व महिला कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# नांदेड परिमंडलात ६३ सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित

## २७२ मेगावॅट सौर ऊर्जेमुळे शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध



**नांदेड (प्रतिनिधी)**– महावितरणच्या नांदेड परिमंडलात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० मध्ये जानेवारी २०२६ ते मे २०२६ या काळात भरीव कामगिरी करण्यात आली आहे. अवघ्या पाच महिन्यांच्या काळात तब्बल ३० नवीन सौर ऊर्जा प्रकल्प् कार्यान्वित झाले आहेत. परिमंडलात आता कार्यान्वित सौर प्रकल्पांची संख्या ६३ वर पोहचली असून त्यातून २७२ मेगावॅट सौर ऊर्जेची निर्मिती होते. या योजने–मुळे कृषीपंप ग्राहकांना दिवसाच्या कालावधीत सिंचनाची सोय उपलब्ध झाली आहे.

जानेवारी ते मे २०२६ या काळात घोरदरी (ता. सेनगाव) ५ मेगावॅट, उमरी बाजार (किनवट) येथे ४ मेगावॅट, मांडवी (किनवट) ५ मेगावॅट, मुखेड येथे २ मेगावॅट, बोरजा (औंढा) ३ मेगावॅट, औंढा (ना) येथे ३ मेगावॅट, जिंतूर येथे ३ मेगावॅट, माळकौठा (मुखेड) ६ मेगावॅट, कासापुरी (पाथरी) ३ मेगावॅट, ताडकळस (पूर्णा) ५ मेगावॅट, दासला (सेलू) २ मेगावॅट, रामे टाकळी (मानवत) ४ मेगावॅट, पिंपरी झोला (गंगाखेड) ५ मेगावॅट, गुंज (पाथरी) २ मेगावॅट, ब्रम्हपुरी (परभणी) ४ मेगावॅट, जवळा बुद्रूक (सेनगाव) २ मेगावॅट, कासराळी (बिलोली) ५ मेगावॅट, बोरी सावंत (वसमत) २ मेगावॅट, करडखेड (देगलूर) ३ मेगावॅट, वारंगा (कळमनुरी) ४ मेगावॅट, नवीन जिंतूर ७ मेगावॅट, बारड (नांदेड) ५ मेगावॅट, पळशी (हिंगोली) ४ मेगावॅट, जांब (परभणी) ५ मेगावॅट, ब्राम्हणगाव (परभणी) ५ मेगावॅट, माटेगाव (परभणी) ५ मेगावॅट, गोरेगाव (हिंगोली) ७ मेगावॅट, निवघा (भोकर) ५ मेगावॅट, चांडोळा (देगलूर) ५ मेगावॅट, बनवस (परभणी) ५ मेगावॅट या ३० सौर ऊर्जा प्रकल्पांचे काम पूर्ण झाले असून ते पूर्ण क्षमतेने कार्यान्वित झाले आहेत. यापूर्वी अर्थात सप्टेंबर २०२४ पासून डिसेंबर २०२५ अखेरपर्यंत बामणी (देगलूर) ५ मेगावॅट, कापशी (नांदेड) ८ मेगावॅट, जांब (देगलूर) ३ मेगावॅट, उमरी (भोकर) १० मेगावॅट, फुलवळ (नांदेड) ४ मेगावॅट, खानापूर (देगलूर) ३ मेगावॅट, दुधगाव (सेलू) ४ मेगावॅट, पेठवडज (नांदेड) ५ मेगावॅट, पारडी बागल (हिंगोली) ३ मेगावॅट, ढोलउमरी (भोकर) ५ मेगावॅट, चैनापूर (देगलूर) ४ मेगावॅट, कारेगाव (नांदेड) ४ मेगावॅट, पळसपूर (भोकर) ३ मेगावॅट, खिल्लार (हिंगोली) ३ मेगावॅट, मनाठा (भोकर) ५ मेगावॅट, जारीकोट (देगलूर) २ मेगावॅट, सिंधी (भोकर) ७ मेगावॅट, वाई (भोकर) ५ मेगावॅट, साळवा (हिंगोली) ३ मेगावॅट, भोसी (भोकर) ५ मेगावॅट, सेलू (हिंगोली) ४ मेगावॅट, तळणी (नांदेड) ४ मेगावॅट, वाई चोंडी (हिंगोली) ५ मेगावॅट, साळवा (हिंगोली) ५ मेगावॅट, गुगली धामनगाव (सेलू) ४ मेगावॅट, ल्याहरी (भोकर) ५ मेगावॅट, फरकंडा (परभणी) ४ मेगावॅट, कासारखेडा (नांदेड) ५ मेगावॅट, बरबडा (देगलूर) ४ मेगावॅट, मोहनपूरा (नांदेड) ४ मेगावॅट, त्रिधारा (परभणी) ४ मेगावॅट, सारखणी (भोकर) ५ मेगावॅट, लोहगाव (देगलूर) ३ मेगावॅट अशा ३३ सौर ऊर्जा प्रकल्पांचे काम यापूर्वीच पूर्ण झालेले आहे. नांदेड परिमंडलात कार्यान्वीत झालेल्या ६३ प्रकल्पांतून २७२ मेगावॅट सौर ऊर्जेची निर्मिती होऊन त्यातून एक लाखापेक्षा अधिक शेतकऱ्यांना दिवसाच्या कालावधीत अखंडित व सुरळीत वीज पुरवठा होण्यास मदत होत आहे.

CMYK

फॅशन|संसार|सौंदर्य

# सखी

# हळदी समारंभासाठी 'हे' कपडे करा ट्राय!



**हळदी समारंभाला खास पिवळ्या रंगाचे कपडे परिधान केले जातात. पूर्वी फक्त या विधीसाठी वधू आणि वरच पिवळ्या रंगाचे कपडे घालत असत. मात्र काही वर्षांपासून हळदी समारंभासाठी वधूवरांचे नातेवाईक आणि सहभागी होणारी पाहुणेमंडळीही पिवळ्या रंगाचे कपडे परिधान करतात. थोडक्यात हळदी समारंभाची थीम ही आजकाल पिवळ्या रंगाची असते. यासाठीच एखाद्या हळदी समारंभात तुम्ही सहभागी होणार असाल तर पिवळ्या रंगाचे हे आऊटफिट्स तुम्ही नक्कीच ट्राय करू शकता...**

- » साडी : हळदी समारंभ म्हटला की तुमच्या लुकमध्ये नेहमीपेक्षा पारंपरिक टच असायलाच हवा. त्यामुळे कोणत्याही हळदी समारंभासाठी साडी नेसणं हा उत्तम पर्याय ठरेल. पण यासाठी फार महागडी अथवा सिल्कची साडी कधीच निवडू नका. कारण हळदी समारंभात बऱ्याचदा वधूवराला हळद लावून झाली की मौजमस्ती करत नातेवाईक आणि मित्रमंडळींनाही हळद लावली जाते. थोडक्यात आजकाल या समारंभात हळद खेळण्याचा प्रकारदेखील असतो. त्यामुळे साडीचं मटेरिअल वॉशेबल असेल तर उत्तम ठरेल. करिनाप्रमाणे तुम्ही गोल्डन बॉर्डर असलेली यलो साडी नक्कीच निवडू शकता. अशा प्रकारची साडी तुम्ही स्टायलिश पद्धतीने कॅरी करू शकता. फक्त यासोबत मोठ्या आकाराचे गोल्डन इअररिंग्ज आणि मोगऱ्याचा गजरा घालायचा नक्कीच लक्षात ठेवा.
- » लेहंगा : आजकाल साडीसोबतच एथनिक लुकसाठी लेहंगा घालणंही सर्व जणी पसंत करतात. जर तुम्हाला हळदी समारंभासाठी लेहंगा घालायचा असेल तर अशा लेहंगाची निवड करा ज्यामुळे तुम्हाला हळदीचा कार्यक्रम व्यवस्थित साजरा करता येईल. सिल्क अथवा हेव्ही वर्कचा लेहंगा निवडण्यापेक्षा यासाठी कॉटन, चिकन अथवा वॉशेबल मटेरिअलचा लेंगा तुम्ही नक्कीच निवडू शकता. उन्हाळ्यात अशा फॅब्रिकच्या आऊटफिटमध्ये तुम्हाला फार गरमही होणार नाही. यासाठी आलिया भटप्रमाणे लेंगा तुम्ही नक्कीच परिधान करू शकता.
- » पंजाबी ड्रेस : साडी आणि लेंग्याप्रमाणेच हळदी समारंभासाठी खास उठून दिसतात ते पिवळ्या रंगाचे सिल्कचे पंजाबी ड्रेस. आजकाल बाजारात हळदी समारंभासाठी अशा खास पिवळ्या रंगाच्या शेडची खूप मोठी रेंज पंजाबी ड्रेसमध्ये दिसते. तुम्ही तुमच्या आवडीनुसार पिवळ्या रंगातील एखादी छान शेड यासाठी निवडू शकता. मात्र सिल्कचा ड्रेस परिधान केल्यावर तुम्हाला त्यावर हळदीचे डाग लागू नयेत यासाठी थोडी काळजी घ्यावी लागेल. शक्य असल्यास लॉकडाऊन नंतर एखाद्या मोठ्या लग्नसोहळ्यासाठी हा आऊटफिट निवडा. कारण हळदी समारंभात तुम्हाला अशा आऊटफिटमध्ये डान्स करणे सोपे जाईल.
- » शरारा सूट : तुम्ही ज्या हळदी समारंभात सहभागी होणार आहात तो किती लोकांच्या उपस्थितीत आणि कुठे साजरा होणार आहे यावरून तुम्ही तुमचे आऊटफिट ठरवू शकता. एखाद्या खास कार्यक्रमासाठी करिश्मा कपूरने परिधान केलेल्या ड्रेसप्रमाणे गोल्डन शरारा सूट घालण्यास काहीच हरकत नाही. कारण यामध्ये तुमचा एथनिक लूक परफेक्ट होईल आणि सर्वांच्या नजरा तुमच्यावरच खिळून राहतील. टस्कन सन यलो रंगाचा हा ड्रेस असून त्यावर रस्ट गोल्डन रंगाची प्रिंट आहे.
- » डिझायनर ड्रेस : हळदी समारंभासाठी तुम्ही एखादा युनिक, इंडोवेस्टर्न डिझायनर ड्रेसदेखील नक्कीच निवडू शकता.

# घरगुती टिप्स प्री ब्रायडल लुकसाठी...



**लग्न हा आपला आयुष्यभराचा आठवणींचा ठेवा असतो. यावेळी प्रत्येक नवरीला अत्यंत सुंदर दिसायचे असते. पण सध्या कोरोना काळात पार्लरमध्ये जाऊन आपल्या चेहऱ्यावर ट्रिटमेंट घेणं काही शक्य नाही. त्यामुळे नवरीसाठी मात्र ही एक समस्याच झाली आहे. आपल्या प्री ब्रायडल लुकसाठी आता टेन्शन घेऊ लागल्या आहेत. तुमच्यापैकी जर कोणी कोरोना काळात लग्न करत असेल तर आम्ही तुम्हाला काही सोप्या घरगुती टिप्स देणार आहोत. ज्यामुळे तुम्ही तुमच्या त्वचेला पार्लरप्रमाणे लुक देऊ शकता. त्वचेवर अधिक चमक आणू शकता. त्यासाठी आता तुम्हाला पार्लरवर अवलंबून राहायची गरज भासणार नाही.**

## चमकदार त्वचा...

लग्नात आपली त्वचा चमकदार दिसेल का नाही हा सर्वात मोठा प्रश्न नवरीला असतो. आपल्या लग्नात सर्वात सुंदर आपणच दिसायला हवं हे प्रत्येक मुलीचं स्वप्न असतं. तुम्हालादेखील चमकदार त्वचा हवी असेल तर तुम्ही लग्नाच्या आधी एक महिन्यापासून दुधात केशर घालून नियमित प्यायला सुरुवात करा. केशराच्या दुधामुळे चेहरा स्वच्छ राहतो आणि चेहऱ्यावर चमक येते.



## घरगुती हेअर मास्क

प्री ब्रायडल लुकमध्ये केवळ चेहराच नाही तर केसांचीही काळजी घ्यावी लागते. केसांची काळजी घेण्यासाठी तुम्ही घरच्या घरी हेअरमास्कचा वापर करू शकता. हेअर मास्क तयार करण्यासाठी तुम्ही अंड्याचा पिवळा भाग घ्या. केसांना साधारण पाऊण तास हा पिवळा भाग लावून ठेवा. त्यानंतर पाण्याने केस स्वच्छ धुवा. हा हेअर मास्क तुम्ही आठवड्यातून दोन वेळा वापरू शकता. यामुळे केसांना अधिक चमक येते आणि केस घनदाट होण्यास मदत मिळते.

## शरीराला मसाज

लग्नाची कामं नाही म्हटली तरी करावीच लागतात. त्यामुळे शरीराला थकवा येणं साहजिक आहे. लग्नापूर्वी बरेच रितीरिवाज करण्याचीही आपल्याकडे पद्धत आहे. त्यामुळे शरीराला थकवा येऊ नये म्हणून काळजी घेण्यासाठी मोहरीचं तेल अथवा नारळाच्या तेलाने शरीराचा तुम्ही नियमित मसाज करा. मसाज केल्याने रक्तप्रवाह योग्य राहातो आणि शरीरावर एक चमक दिसून येते.

## डार्क सर्कल

काही महिलांना डोळ्याखाली डार्क सर्कल अर्थात काळी वर्तुळं आलेली दिसून येतात. कामाच्या टेन्शनमुळे बऱ्याच जणींना हा त्रास उद्भवतो. विशेषतः लग्नाच्या गडबडीचा ताण अधिक आला तर ही समस्या होतेच. पण ही समस्या निर्माण होऊ नये यासाठी तुम्ही रोज काकडीच्या तुकड्यांचा वापर करा. यामुळे डोळ्यांचा थकवा दूर होतोच आणि डोळ्यांखाली काकडीचा रस लावा आणि मसाज करा. यामुळे डोळ्यांखालील काळेपणाही निघून जातो. तुम्हाला लग्नाच्या दिवशी उत्तम चमक चेहऱ्यावर आणि डोळ्याखालीही मिळते.

## हेल्दी डाएट

लग्नात सुंदर दिसण्यासाठी किमान सहा महिने आधीपासूनच आपल्या खाण्यापिण्याकडे लक्ष द्यायला हवे. तेलकट, तूपकट पदार्थ टाळून अत्यंत हेल्दी अशा डाएटकडे लक्ष देऊन व्यवस्थित फॉलो करायला हवे. तसंच चमकदार त्वचेसाठी दिवसातून ८ तास झोप घेणे हे अनिवार्य आहे. झोप व्यवस्थित झाली तर त्वचा उत्तम राहण्यास मदत मिळते.



# सनस्क्रिनचा टाळा अतिवापर!

### त्वचेवर ॲलर्जीक रिॲक्शन

सनस्क्रिनमध्ये अनेक तऱ्हेच्या केमिकल्सचा वापर करण्यात येतो. यामुळे तुमच्या त्वचेवर ॲलर्जी निर्माण होते. लालपणा, खाज, सूज आणि चेहऱ्यावर चट्टे येणे या गोष्टी संकेत देतात की तुमच्या सनस्क्रिनमुळे तुम्हाला ॲलर्जी येत आहे. तसंच यामुळे तुमची त्वचा अधिक संवेदनशील होते. काही सनस्क्रिनमध्ये वापरण्यात येणाऱ्या PABA अर्थात पॅरा अमिनो बेंजॉईक ॲसिडमुळे तुम्हाला ही ॲलर्जी येऊ शकते. त्यामुळे सनस्क्रिनचा वापर करताना हा योग्य प्रमाणात करायला हवा.

**कसे वाचाल :** सनस्क्रिन घेताना त्यामध्ये कोणते घटक आहेत याची शहानिशा करून घ्यावे. तसंच हायपोलेर्गेनिक लेबल असणारे सनस्क्रिन तुम्ही खरेदी करा. याशिवाय तुम्ही 24 तासांची एक पॅच टेस्टही करून पाहू शकता. यामुळे सनस्क्रिनचा तुमच्या त्वचेवर कोणताही वाईट परिणाम होत नाहीये हे तुम्हाला कळेल आणि वापरणं सहज शक्य होईल.

### डोळ्यांमध्ये जळजळ

डोळे हा अत्यंत कोमल भाग आहे. सनस्क्रिन चुकूनही डोळ्याच्या आत गेलं तरीही डोळ्यांची जळजळ होऊन तुम्हाला डोळ्यांचा त्रास सुरू होऊ शकतो. तसंच यामुळे डोळ्यांची संवेदनशीलता कमी होऊ शकते. त्यामुळे याचा वापर अति करू नका.

**कसे वाचाल :** चेहऱ्यावर सनस्क्रिन लावताना आपल्या डोळ्यांच्या खाली अथवा डोळ्यांच्या आजूबाजूला लावू नका.

### ॲक्नेची समस्या

तुम्हाला जर ॲक्नेची समस्या असेल तर सनस्क्रिन लावल्यानंतर तुमच्या त्वचेची ही समस्या अधिक वाढीला लागते.

**कसे वाचाल :** अशा सनस्क्रिनचा वापर करा जे तुमच्या त्वचेच्या टाईपला योग्य ठरते. नॉन ग्रीसी आणि नॉन कॉमेडोजेनिक सनस्क्रिन हे तुमच्या त्वचेसाठी जास्त फायदेशीर ठरू शकते.



# लग्नानंतर चेहऱ्यावर तेज आणायचे?

**प्रत्येक नवरीला वाटत असतं की लग्नात तिचं रूप खुलून यावं. कारण लग्नसोहळ्यातील प्रत्येक विधीत सर्वांच्या नजरा नवरीवर खिळलेल्या असतात. लग्नात आनंद आणि उत्साहामुळे नववधूच्या चेहऱ्यावर एक तेज निर्माण होत असतं. मात्र लग्नातील विधी आणि इतर दगदग यामुळे तिला थकवा जाणवू लागतो आणि लग्नानंतर अचानक चेहऱ्यावरील तेज कमी होतं. लग्नसोहळ्यात नवरा नवरीला आराम करण्यासाठी पुरेसा वेळ मिळत नाही. ज्यामुळे शारीरिक थकवा चेहऱ्यावर दिसू शकतो. यासाठीच नवरीने या टिप्स फॉलो करणं गरजेचं आहे. ज्यामुळे लग्नानंतरही ती कायम सुंदर आणि उत्साही दिसेल...**



## काही सोप्या टिप्स...



- ■ लग्नानंतर रात्री घरी गेल्यावर चेहऱ्यावरील मेकअप व्यवस्थित काढा. चेहरा, मान आणि पाठीवरील मेकअप काढण्यासाठी चांगले क्लिंझर, मेकअप रिमूव्हर आणि कॉटन पॅडचा वापर करा.
- ■ मेकअप काढण्याचं साहित्य जवळ नसेल तर कच्च्या दूधानेही तुम्ही तुमचा मेकअप काढू शकता. मात्र लक्षात ठेवा कितीही कंटाळा आला तरी मेकअप तसाच ठेवून मुळीच झोपू नका.
- ■ लग्नकार्याच्या दिवशी भरपूर पाणी प्या, ज्यामुळे तुमचे डिहायड्रेशन होणार नाही. कारण लग्नकार्यात जरी तुमचे जेवण व्यवस्थित झाले नाही अथवा तुम्हाला पुरेशी झोप मिळाली नाही तरी दुसऱ्या दिवशी तुमचा चेहरा टवटवीत दिसेल.
- ■ शक्य असल्यास रात्री घरी गेल्यावर गरम पाण्यात मीठ टाकून त्यात पाय टाकून थोडावेळ बसा. कारण दिवसभर हायहिल्स घालून उभं राहिल्यामुळे तुमच्या पायाच्या टाचा आणि पोटऱ्या दुखू लागतात. शारीरिक थकवा दुसऱ्या दिवशी चेहऱ्यावर दिसू लागेल यासाठी हा उपाय करणं उत्तम ठरेल.
- ■ तुमच्यासोबत तुमचा मेकअप बॉक्स सतत असू द्या. कारण दुसऱ्या दिवशी लग्नातील इतर विधींसाठी जर तुम्हाला स्वतःच पटकन तयार व्हावं लागलं तर तुमचा मेकअप स्वतःच करू शकाल.
- ■ मेकअप किटमध्ये टिश्यू पेपर, क्लिंझर, मेकअप रिमूव्हर, बेसिक मेकअपचे साहित्य, फेश वॉश, नॅपकीन, लिपस्टिक, मॉईश्चराईझर, बॉबी पिन्स, हेअर पिन्स असेल याची काळजी घ्या.
- ■ लग्नानंतर काही दिवस गडद आणि आकर्षक रंगसंगतीचे कपडे अथवा साड्या नेसा. ज्यामुळे तुमचे रूप नेहमीच खुललेले दिसेल.
- ■ लग्नानंतर काही दिवस तुमच्या सौभाग्याची लक्षणे असलेले दागिने आणि इतर साहित्य वापरा. जसं की, मंगळसूत्र, टिकली, जोडवी, सिंदूर, बांगड्या ज्यामुळे तुम्ही नवीन नवरी आहात हे पटकन जाणवेल.
- ■ लिपस्टिक लावताना ती तुमच्या साडी, ड्रेसला मॅचिंग लावा. ज्यामुळे तुमचे रुप नेहमीच आकर्षक दिसेल.
- ■ काही दिवस डोळ्यांना काजळ, आयलायनर, मस्कारा लावण्यास विसरू नका. ज्यामुळे तुमचे डोळे आकर्षक आणि तेजस्वी दिसतील.
- ■ साडी, ड्रेस आणि मेकअपप्रमाणेच केसांच्या स्टाईलकडे व्यवस्थित लक्ष द्या.
- ■ जर तुमचे केस छोटे असतील तर मोकळे सोडण्यास काहीच हरकत नाही. मात्र मोठे असतील तर सैल वेणी, अंबाडा अशा हेअरस्टाईल करा. ज्यामुळे तुम्ही थोड्या मॅच्युअर्ड वाटाल.
- ■ चेहऱ्यावर डाग अथवा व्रण असतील तर लग्नानंतर काही दिवस कन्सिलर आणि फाऊंडेशनचा वापर करा. ज्यामुळे लग्नानंतर केल्या जाणाऱ्या एखाद्या विधीसाठी तुम्ही पटकन छान दिसाल.
- ■ वागण्याबोलण्यात आणि दिसण्यात सहजता ठेवा, उगाचच काहीतरी वेगळं करण्याचा प्रयत्न करू नका. त्यामुळे तुम्हाला अवघडल्यासारखं वाटेल ज्याचा परिणाम तुमच्या चेहऱ्यावर दिसू लागेल.
- ■ सकाळी व्यायाम करणं शक्य नसेल तर कमीत कमी प्राणायम आणि मेडिटेशन करा ज्यामुळे तुम्हाला फ्रेश वाटेल.

**जर तुमचं लग्न ठरलं असेल आणि तुम्ही लग्नाच्या तयारीला लागला असाल तर लग्नसोहळ्यानंतर कायम उत्साही दिसण्यासाठी या टिप्स फॉलो करा. ज्यामुळे तुमच्या चेहऱ्यावर नव्या नवरीचे तेज कायम टिकेल.**

**जाहिरप्रगटन**

**सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, बिलोली यांचे न्यायालय**

किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ११३/२०२६

**कुसुमबाई व ईतर विरुध्द विश्वनाथ**

**अर्जदार** :- १. कुसुमबाई भ्र. मुकुंदराव चिंतले, वय- ४५ वर्षे,
२. मायावती पि. मुकुंदराव चिंतले, वय- २८ वर्षे,
३. अमर पि. मुकुंदराव चिंतले, वय- २३ वर्षे,
सर्व रा. आदमपुर ता. बिलोली जि. नांदेड

**विरूध्द**

**निरंक**

विषय :- वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत....

ज्याअर्थी अर्जदारांनी या न्यायालयात अर्ज सादर केला असुन त्यात असे कथन केले आहे की, मयत **मुकुंद पि. विठल चिंतले** यांचे अर्जदार क्र. १ ही पत्नी असुन अर्जदार क्र.२ ही मुलगी व अर्जदार क्र. ३ हा मुलगा आहे. अर्जदार हे मौजे आदमपुर ता. बिलोली जि.नांदेड येथील रहिवाशी आहेत. मयत **मुकुंद पि. विठल चिंतले** यांचा मृत्यु दिनांक **दि.३०/०१/२०२६** रोजी राहत्या घरी मृत्यु झाला आहे. मयताची आई नामे गुंडाबाई विठल चिंतले यांचा मृत्यु दिनांक १८/१२/२०२४ रोजी व वडिलांचा मृत्यु दिनांक ०४/०८/१९८३ रोजी झाला आहे. मयताच्या पश्चात अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस असून इतर कोणीही मयताचे वारस नाहीत असे अर्जदारांचे म्हणणे आहे.

हे की, मयत **मुकुंद पि. विठल चिंतले** यांचे कायदेशिर वारस म्हणुन वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्जदारांनी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. तरी, उपरोक्त प्रकरणी सर्द संबंधितास कळविण्यात येते की, वरील अर्जदार यांच्या नावे वारसा प्रमाणपत्र देणे बाबत कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो लेखी स्वरूपात स्वतः हजर राहून अथवा त्यांचे विधिज्ञ यांचे मार्फत **दिनांक २२/०६/२०२६** रोजी किंवा तत्पूर्वी या न्यायालयात सादर करावा. अन्यथा कोणासही कांही आक्षेप/ उजर नाही असे समजुन प्रकरणात पुढील कायदेशीर आदेश निर्गमीत करण्यात येतील.

आज दि. ०६ मे, २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याने देण्यात आले.

सहा. अधिक्षक
सह दिवाणी न्यायालय क.स्तर, बिलोली

# Change In Name

My old Name is LAYEEQUE KHAN. Which now I am Changing as New Name LAYEEQUE AHMED KHAN. Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the name

Address: H.No. 1-20-80, Ashraf Nagar, Near Hazare Hospital, Hingoli Gate, Nanded
Mo.No. 9552000698

# Change In Name

My old Name is MOHAMMAD ZAID. Which now I am Changing as New Name MOHAMMAD ZAID KHAN LAYEEQUE AHMED KHAN. Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the name

Address: H.No. 1-20-80, Ashraf Nagar, Near Hazare Hospital, Hingoli Gate, Nanded
Mo.No. 9552000698

**जाहीर नोटीस**

**ठाणे येथील माननीय न्यायाधीश, कौटुंबिक न्यायालय, न्यायालय क २, ठाणे.**

याचिका क्र. ए- १०९/२०२५
निशाणी क्र. २८

**श्री. विनोद भिमराव आचणे**
वय ३५ वर्षे, व्यवसाय : नोकरी
रा. पत्ता : ४०३, सिध्दीविनायक रेसिडेन्सीयल कॉम्प्लेक्स, दिवा दातिवली रोड, मारुती नगर, दिवा (पु.), जि.ठाणे ४०० ६१२ ....... याचिकाकर्ता

विरुद्ध.....

**सौ. अनिता विनोद आचणे**
वय ३२ वर्षे, व्यवसाय : नोकरी
रा. पत्ता : सरकारी दवाखाना, शासकीय निवास स्थान, मुखेड, नांदेड ४३१७१५ महाराष्ट्र, मोबा. ९८३४६५९९१७ .... सामनेवाले

**एकतर्फी कार्यवाहीसाठी नोटीस :**

सर्वसाधारण जनतेस कळविण्यात येते की, वरील खटल्यात प्रतिवादी, **सौ. अनिता विनोद आचणे** यांना यापूर्वी समन्सादवारे नोटीस बजावण्यात आली होती. परंतु समन्स त्यांच्या राहत्या पत्त्यावर **सरकारी दवाखाना, शासकीय निवास स्थान, मुखेड, नांदेड ४३१७१५** येथे जाणून बुजून समन्स घेणे टाळले व नियुक्त तारखेला हजर राहणे किंवा त्यांचे म्हणणे मांडणे यापैकी कोणतीही कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे माननीय कोर्टाने पर्यायी मार्ग म्हणून स्थानिक वृत्तपत्रामध्ये प्रकाशन करण्याचे आदेश जारी केले आहेत.

या प्रकाशनादवारे सामनेवाले यांना प्रकाशनाच्या ३० दिवसांच्या आत किवा दि.०२.०७.२०२६ रोजी याचिका क्र.: ए/१०९/२०२५ मध्ये ठाणे कौटूंबिक न्यायालय येथे हजर राहण्याचे निर्देश देण्यात येत आहेत, जर तुम्ही न्यायालयात हजर राहिला नाहीत तर न्यायालययाने एकतर्फी कार्यवाही निर्णय घेतला जाऊ शकतो.

**नोटीसचा तपशील :**

१. खटल्याचे नाव : **श्री. विनोद भिमराव आचणे** विरुध्द **सौ. अनिता विनोद आचणे**
२. खटला क्रमांक : ए-१०९/२०२५
३. न्यायालय : ठाणे येथील माननीय प्रमुख न्यायाधीश, कौटुंबिक न्यायालय, न्यायालय क्र. २, ठाणे.
४. पुढील सुनावणीची तारीख : ०२.०७.२०२६
५. वादीचे नाव - **श्री. विनोद भिमराव आचणे**

प्रतिवादीस सूचना **सौ. अनिता विनोद आचणे** यांना यामार्फत कळविण्यात येते की, त्यांनी ०२.०७.२०२६ रोजी किंवा कौटूंबिक न्यायालय, ठाणे येथे हजर रहावे आणि त्यांचे म्हणणे मांडावे, अन्यथा न्यायालय याचिकाकर्ता **श्री. विनोद भिमराव आचणे** यांच्या बाजूने निर्णय होऊ शकतो आणि त्यामुळे होणा-या सर्व खर्च, जोखीम व परिणामांसाठी सामनेवाले **सौ. अनिता विनोद आचणे** जबाबदार राहतील.

क. लिपिक
कौटुंबिक न्यायालय, ठाणे.

प्रभारी प्रबंधक
कौटूंबिक न्यायालय, ठाणे.

# Change In Name

My old Name is SHAIKH SANA PARVEEN SHAIKH FEROZUDDIN. Which now I am Changing as New Name SANAPARVEEN ABRARKHAN PATHAN. Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the name

Address: BILAL NAGAR, TAMSA, TQ HADGAON, DIST. NANDED-431712
Mob: 9404670675


# कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८




## जाहीर प्रगटन

सर्वसंबंधित व सर्वसामान्य जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येतेकी, माझे पक्षकार AEW Smart Service Private Limited, SMA Co-operative Industrial Estate, G.T. Karnal Road, Jahangirpuri D Block, North West Delhi-110033, प्रो. प्रा. आशीष सिंगल, रा. दिल्ली यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून हे जाहीर प्रगटन देण्यात येत आहे.

माझे पक्षकार यांनी मौजे शिरूर, ता. उमरी, जि. नांदेड येथील गट क्रमांक ७२ मधील क्षेत्र ०.३० हे. आर. आकार रु. ०.८० पैसे असलेली शेषाबाई मारोती हुस्सेवाड यांच्या मालकी हक्कातील व ताब्यातील जमीन कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरवले असून त्याबाबतचा व्यवहार निश्चित करण्यात आलेला आहे.

तरी सदर शेत जमिनीबाबत कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हिस्सा, वारसा हक्क, दावा, आक्षेप, बोजा, तारण, गहाण, कर्ज, करार, इसारपावती, कुळहक्क, भाडेपट्टा, रास्ता हक्क, न्यायालयीन वाद, अथवा अन्य कोणताही कायदेशीर हक्क असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत संपूर्ण कागदपत्रांसह खालील नमूद पत्त्यावर लेखी स्वरूपात कळवावे. अन्यथा, निर्धारित मुततीत कोणताही दवा अथवा आक्षेप प्राप्त न झाल्यास सदर मालमत्तेबाबत कोणाचाही हक्क अथवा आक्षेप नाही असे समजून माझे पक्षकार पुढील खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर प्राप्त होणारे कोणतेही दावे अथवा आक्षेप ग्राह्य धरले जाणार नाहीत. सबब हे जाहीर प्रगटन

तर्फे
ॲड. बी. डी. कुलकर्णी
मंजुळा नगर, भोकर, ता. भोकर,
जि.नांदेड-४३१८०१
मो.नं. ८८५६८०१२२९.

जाहीर प्रगटन देणार
AEW Smart Service
Private Limited
प्रो. प्रा. आशीष सिंगल,
रा. दिल्ली.

## जाहीर प्रगटन

सर्वसंबंधित व सर्वसामान्य जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येतेकी, माझे पक्षकार AEW Smart Service Private Limited, SMA Co-operative Industrial Estate, G.T. Karnal Road, Jahangirpuri D Block, North West Delhi-110033, प्रो. प्रा. आशीष सिंगल, रा. दिल्ली यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून हे जाहीर प्रगटन देण्यात येत आहे.

माझे पक्षकार यांनी मौजे शिरूर, ता. उमरी, जि. नांदेड येथील गट क्रमांक ७२ मधील क्षेत्र ०.९७ हे. आर. आकार रु. २.५८ पैसे असलेली श्री भुजंग चोखोबा डोंगरे यांच्या मालकी हक्कातील व ताब्यातील जमीन कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरवले असून त्याबाबतचा व्यवहार निश्चित करण्यात आलेला आहे.

तरी सदर शेत जमिनीबाबत कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हिस्सा, वारसा हक्क, दावा, आक्षेप, बोजा, तारण, गहाण, कर्ज, करार, इसारपावती, कुळहक्क, भाडेपट्टा, रास्ता हक्क, न्यायालयीन वाद, अथवा अन्य कोणताही कायदेशीर हक्क असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत संपूर्ण कागदपत्रांसह खालील नमूद पत्त्यावर लेखी स्वरूपात कळवावे. अन्यथा, निर्धारित मुततीत कोणताही दवा अथवा आक्षेप प्राप्त न झाल्यास सदर मालमत्तेबाबत कोणाचाही हक्क अथवा आक्षेप नाही असे समजून माझे पक्षकार पुढील खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर प्राप्त होणारे कोणतेही दावे अथवा आक्षेप ग्राह्य धरले जाणार नाहीत. सबब हे जाहीर प्रगटन

तर्फे
ॲड. बी. डी. कुलकर्णी
मंजुळा नगर, भोकर, ता. भोकर,
जि.नांदेड-४३१८०१
मो.नं. ८८५६८०१२२९.

जाहीर प्रगटन देणार
AEW Smart Service
Private Limited
प्रो. प्रा. आशीष सिंगल,
रा. दिल्ली.

## जाहीर प्रगटन

सर्वसंबंधित व सर्वसामान्य जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येतेकी, माझे पक्षकार AEW Smart Service Private Limited, SMA Co-operative Industrial Estate, G.T. Karnal Road, Jahangirpuri D Block, North West Delhi-110033, प्रो. प्रा. आशीष सिंगल, रा. दिल्ली यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून हे जाहीर प्रगटन देण्यात येत आहे.

माझे पक्षकार यांनी मौजे शिरूर, ता. उमरी, जि. नांदेड येथील गट क्रमांक ७९ मधील क्षेत्र २.०० हे. आर. आकार रु. २.९१ पैसे असलेली श्री रावसाहेब बाबाराव पडोळे यांच्या मालकी हक्कातील व ताब्यातील जमीन कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरवले असून त्याबाबतचा व्यवहार निश्चित करण्यात आलेला आहे.

तरी सदर शेत जमिनीबाबत कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हिस्सा, वारसा हक्क, दावा, आक्षेप, बोजा, तारण, गहाण, कर्ज, करार, इसारपावती, कुळहक्क, भाडेपट्टा, रास्ता हक्क, न्यायालयीन वाद, अथवा अन्य कोणताही कायदेशीर हक्क असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत संपूर्ण कागदपत्रांसह खालील नमूद पत्त्यावर लेखी स्वरूपात कळवावे. अन्यथा, निर्धारित मुततीत कोणताही दवा अथवा आक्षेप प्राप्त न झाल्यास सदर मालमत्तेबाबत कोणाचाही हक्क अथवा आक्षेप नाही असे समजून माझे पक्षकार पुढील खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर प्राप्त होणारे कोणतेही दावे अथवा आक्षेप ग्राह्य धरले जाणार नाहीत. सबब हे जाहीर प्रगटन

तर्फे
ॲड. बी. डी. कुलकर्णी
मंजुळा नगर, भोकर, ता. भोकर,
जि.नांदेड-४३१८०१
मो.नं. ८८५६८०१२२९.

जाहीर प्रगटन देणार
AEW Smart Service
Private Limited
प्रो. प्रा. आशीष सिंगल,
रा. दिल्ली.

## जाहीर प्रगटन

सर्वसंबंधित व सर्वसामान्य जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येतेकी, माझे पक्षकार AEW Smart Service Private Limited, SMA Co-operative Industrial Estate, G.T. Karnal Road, Jahangirpuri D Block, North West Delhi-110033, प्रो. प्रा. आशीष सिंगल, रा. दिल्ली यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून हे जाहीर प्रगटन देण्यात येत आहे.

माझे पक्षकार यांनी मौजे शिरूर, ता. उमरी, जि. नांदेड येथील गट क्रमांक ७३ मधील क्षेत्र १.३० हे. आर. आकार रु. ३.८० पैसे असलेली श्री मोहन आनंदराव हुस्सेवाड यांच्या मालकी हक्कातील व ताब्यातील जमीन कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरवले असून त्याबाबतचा व्यवहार निश्चित करण्यात आलेला आहे.

तरी सदर शेत जमिनीबाबत कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हिस्सा, वारसा हक्क, दावा, आक्षेप, बोजा, तारण, गहाण, कर्ज, करार, इसारपावती, कुळहक्क, भाडेपट्टा, रास्ता हक्क, न्यायालयीन वाद, अथवा अन्य कोणताही कायदेशीर हक्क असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत संपूर्ण कागदपत्रांसह खालील नमूद पत्त्यावर लेखी स्वरूपात कळवावे. अन्यथा, निर्धारित मुततीत कोणताही दवा अथवा आक्षेप प्राप्त न झाल्यास सदर मालमत्तेबाबत कोणाचाही हक्क अथवा आक्षेप नाही असे समजून माझे पक्षकार पुढील खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर प्राप्त होणारे कोणतेही दावे अथवा आक्षेप ग्राह्य धरले जाणार नाहीत. सबब हे जाहीर प्रगटन

तर्फे
ॲड. बी. डी. कुलकर्णी
मंजुळा नगर, भोकर, ता. भोकर,
जि.नांदेड-४३१८०१
मो.नं. ८८५६८०१२२९.

जाहीर प्रगटन देणार
AEW Smart Service
Private Limited
प्रो. प्रा. आशीष सिंगल,
रा. दिल्ली.

## जाहीर प्रगटन

सर्वसंबंधित व सर्वसामान्य जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येतेकी, माझे पक्षकार AEW Smart Service Private Limited, SMA Co-operative Industrial Estate, G.T. Karnal Road, Jahangirpuri D Block, North West Delhi-110033, प्रो. प्रा. आशीष सिंगल, रा. दिल्ली यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून हे जाहीर प्रगटन देण्यात येत आहे.

माझे पक्षकार यांनी मौजे शिरूर, ता. उमरी, जि. नांदेड येथील गट क्रमांक ७४ मधील क्षेत्र १.०५ हे. आर. आकार रु. १.५१ पैसे असलेली श्री मारोती साहेबराव गाडेवाड यांच्या मालकी हक्कातील व ताब्यातील जमीन कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरवले असून त्याबाबतचा व्यवहार निश्चित करण्यात आलेला आहे.

तरी सदर शेत जमिनीबाबत कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हिस्सा, वारसा हक्क, दावा, आक्षेप, बोजा, तारण, गहाण, कर्ज, करार, इसारपावती, कुळहक्क, भाडेपट्टा, रास्ता हक्क, न्यायालयीन वाद, अथवा अन्य कोणताही कायदेशीर हक्क असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत संपूर्ण कागदपत्रांसह खालील नमूद पत्त्यावर लेखी स्वरूपात कळवावे. अन्यथा, निर्धारित मुततीत कोणताही दवा अथवा आक्षेप प्राप्त न झाल्यास सदर मालमत्तेबाबत कोणाचाही हक्क अथवा आक्षेप नाही असे समजून माझे पक्षकार पुढील खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर प्राप्त होणारे कोणतेही दावे अथवा आक्षेप ग्राह्य धरले जाणार नाहीत. सबब हे जाहीर प्रगटन

तर्फे
ॲड. बी. डी. कुलकर्णी
मंजुळा नगर, भोकर, ता. भोकर,
जि.नांदेड-४३१८०१
मो.नं. ८८५६८०१२२९.

जाहीर प्रगटन देणार
AEW Smart Service
Private Limited
प्रो. प्रा. आशीष सिंगल,
रा. दिल्ली.

**जाहीर प्रगटन**

**दिवाणी न्यायालय व.स्तर, भोकर, ता. भोकर, जि. नांदेड यांच्या न्यायालयात**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांक १०७/२०२६

शोभा दिलीपराव तेललवार व इतर वि. निरंक

अर्जदार:- १. शोभा दिलीपराव तेललवार
वय ६२ वर्षे, व्यवसाय – घरकाम
रा.भोकर ता.भोकर जि.नांदेड
२. संदिप दिलीपराव तेललवार
वय ४० वर्षे, व्यवसाय – खाजगी नोकरी
रा.भोकर ता.भोकर जि.नांदेड
३. संचिन दिलीपराव तेललवार
वय ३७ वर्षे, व्यवसाय – व्यापार
रा.भोकर ता.भोकर जि.नांदेड
४. दिपाली दिलीपराव तेललवार
रा. संजय हाउसिंग सोसायटी, संकल्प मंगल कार्यालय समोर, उस्मानपुरा, औरंगाबाद ता.जि. औरंगाबाद

**विरूध्द**

गैरअर्जदार :- निरंक

दावा :- कलम २ मुंबई रेग्युलेशन द VIII १८२७ कायदयाप्रमाणे मयताचे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत..

या जाहीर प्रगटनाव्दारे सर्व संबंधितास कळविण्यात येते की, अर्जदार क्र.१ यांचे पती व अर्जदार क्र. २ ते ४ यांचे वडील मयत नामे **दिलीप व्यंकटराव तेललवार** यांचा मृत्यू दिनांक १२/०५/२०२५ रोजी रा.भोकर ता.भोकर जि.नांदेड येथे झाला असून त्याच्या मृत्युपत्राआधारे वारस प्रमाणपत्र मिळण्याकरिता अर्जदार यांनी या न्यायालयात ॲड. एन.एच येरावार , यांच्यामार्फत अर्ज दाखल केला आहे.

सदर अर्जदार यांच्या नावे मयतांचे मृत्यूपत्राआधारे वारसा प्रमाणपत्र मिळण्याकरिता जर कोणाचा आक्षेप/उजर असल्यास त्यांनी सदर जाहिरात प्रसिध्दीच्या दिनांकापासून ३० दिवसाच्या आत दिवाणी न्यायालय व. स्तर, भोकर, जि. नांदेड येथे आपण स्वतः, वकिलामार्फत हजर राहून लेखी स्वरूपात आपले म्हणणे /आक्षेप नोंदवावे, अन्यथा कोणासही आक्षेप नाही असे समजून योग्य तो निर्णय दिला जाईल याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

आज दिनांक १७/०४/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

वरिष्ठ लिपिक
दिवाणी न्यायालय व.स्तर भोकर.

अधिक्षक
दिवाणी न्यायालय व.स्तर, भोकर.

## जाहीर प्रगटन

सर्वसंबंधित व सर्वसामान्य जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येतेकी, माझे पक्षकार AEW Smart Service Private Limited, SMA Co-operative Industrial Estate, G.T. Karnal Road, Jahangirpuri D Block, North West Delhi-110033, प्रो. प्रा. आशीष सिंगल, रा. दिल्ली यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून हे जाहीर प्रगटन देण्यात येत आहे.

माझे पक्षकार यांनी मौजे शिरूर, ता. उमरी, जि. नांदेड येथील गट क्रमांक ७२ मधील क्षेत्र १.११ हे. आर. आकार रु. २.९५ पैसे असलेली श्री तुकाराम ग्यानोबा यांच्या मालकी हक्कातील व ताब्यातील जमीन कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरवले असून त्याबाबतचा व्यवहार निश्चित करण्यात आलेला आहे.

तरी सदर शेत जमिनीबाबत कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हिस्सा, वारसा हक्क, दावा, आक्षेप, बोजा, तारण, गहाण, कर्ज, करार, इसारपावती, कुळहक्क, भाडेपट्टा, रास्ता हक्क, न्यायालयीन वाद, अथवा अन्य कोणताही कायदेशीर हक्क असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत संपूर्ण कागदपत्रांसह खालील नमूद पत्त्यावर लेखी स्वरूपात कळवावे. अन्यथा, निर्धारित मुततीत कोणताही दवा अथवा आक्षेप प्राप्त न झाल्यास सदर मालमत्तेबाबत कोणाचाही हक्क अथवा आक्षेप नाही असे समजून माझे पक्षकार पुढील खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर प्राप्त होणारे कोणतेही दावे अथवा आक्षेप ग्राह्य धरले जाणार नाहीत. सबब हे जाहीर प्रगटन

तर्फे
ॲड. बी. डी. कुलकर्णी
मंजुळा नगर, भोकर, ता. भोकर,
जि.नांदेड-४३१८०१
मो.नं. ८८५६८०१२२९.

जाहीर प्रगटन देणार
AEW Smart Service
Private Limited
प्रो. प्रा. आशीष सिंगल,
रा. दिल्ली.

## जाहीर प्रगटन

सर्वसंबंधित व सर्वसामान्य जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येतेकी, माझे पक्षकार AEW Smart Service Private Limited, SMA Co-operative Industrial Estate, G.T. Karnal Road, Jahangirpuri D Block, North West Delhi-110033, प्रो. प्रा. आशीष सिंगल, रा. दिल्ली यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून हे जाहीर प्रगटन देण्यात येत आहे.

माझे पक्षकार यांनी मौजे शिरूर, ता. उमरी, जि. नांदेड येथील गट क्रमांक ७७ मधील क्षेत्र ०.२३ हे. आर. आकार रु. ०.५४ पैसे असलेली श्री मारोती नागन यांच्या मालकी हक्कातील व ताब्यातील जमीन कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरवले असून त्याबाबतचा व्यवहार निश्चित करण्यात आलेला आहे.

तरी सदर शेत जमिनीबाबत कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हिस्सा, वारसा हक्क, दावा, आक्षेप, बोजा, तारण, गहाण, कर्ज, करार, इसारपावती, कुळहक्क, भाडेपट्टा, रास्ता हक्क, न्यायालयीन वाद, अथवा अन्य कोणताही कायदेशीर हक्क असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत संपूर्ण कागदपत्रांसह खालील नमूद पत्त्यावर लेखी स्वरूपात कळवावे. अन्यथा, निर्धारित मुततीत कोणताही दवा अथवा आक्षेप प्राप्त न झाल्यास सदर मालमत्तेबाबत कोणाचाही हक्क अथवा आक्षेप नाही असे समजून माझे पक्षकार पुढील खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर प्राप्त होणारे कोणतेही दावे अथवा आक्षेप ग्राह्य धरले जाणार नाहीत. सबब हे जाहीर प्रगटन

तर्फे
ॲड. बी. डी. कुलकर्णी
मंजुळा नगर, भोकर, ता. भोकर,
जि.नांदेड-४३१८०१
मो.नं. ८८५६८०१२२९.

जाहीर प्रगटन देणार
AEW Smart Service
Private Limited
प्रो. प्रा. आशीष सिंगल,
रा. दिल्ली.

## जाहीर प्रगटन

सर्वसंबंधित व सर्वसामान्य जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येतेकी, माझे पक्षकार AEW Smart Service Private Limited, SMA Co-operative Industrial Estate, G.T. Karnal Road, Jahangirpuri D Block, North West Delhi-110033, प्रो. प्रा. आशीष सिंगल, रा. दिल्ली यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून हे जाहीर प्रगटन देण्यात येत आहे.

माझे पक्षकार यांनी मौजे शिरूर, ता. उमरी, जि. नांदेड येथील गट क्रमांक ७४ मधील क्षेत्र १.०१ हे. आर. आकार रु. १.४५ पैसे असलेली सौ. चंद्रकलाबाई बालाजी गाडेवाड यांच्या मालकी हक्कातील व ताब्यातील जमीन कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरवले असून त्याबाबतचा व्यवहार निश्चित करण्यात आलेला आहे.

तरी सदर शेत जमिनीबाबत कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हिस्सा, वारसा हक्क, दावा, आक्षेप, बोजा, तारण, गहाण, कर्ज, करार, इसारपावती, कुळहक्क, भाडेपट्टा, रास्ता हक्क, न्यायालयीन वाद, अथवा अन्य कोणताही कायदेशीर हक्क असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत संपूर्ण कागदपत्रांसह खालील नमूद पत्त्यावर लेखी स्वरूपात कळवावे. अन्यथा, निर्धारित मुततीत कोणताही दवा अथवा आक्षेप प्राप्त न झाल्यास सदर मालमत्तेबाबत कोणाचाही हक्क अथवा आक्षेप नाही असे समजून माझे पक्षकार पुढील खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर प्राप्त होणारे कोणतेही दावे अथवा आक्षेप ग्राह्य धरले जाणार नाहीत. सबब हे जाहीर प्रगटन

तर्फे
ॲड. बी. डी. कुलकर्णी
मंजुळा नगर, भोकर, ता. भोकर,
जि.नांदेड-४३१८०१
मो.नं. ८८५६८०१२२९.

जाहीर प्रगटन देणार
AEW Smart Service
Private Limited
प्रो. प्रा. आशीष सिंगल,
रा. दिल्ली.

## जाहीर प्रगटन

सर्वसंबंधित व सर्वसामान्य जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येतेकी, माझे पक्षकार AEW Smart Service Private Limited, SMA Co-operative Industrial Estate, G.T. Karnal Road, Jahangirpuri D Block, North West Delhi-110033, प्रो. प्रा. आशीष सिंगल, रा. दिल्ली यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून हे जाहीर प्रगटन देण्यात येत आहे.

माझे पक्षकार यांनी मौजे शिरूर, ता. उमरी, जि. नांदेड येथील गट क्रमांक ७२ मधील क्षेत्र ०.४० हे. आर. आकार रु. १.०६ पैसे असलेली श्री ज्ञानेश्वर लक्ष्मण डुबुकवाड यांच्या मालकी हक्कातील व ताब्यातील जमीन कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरवले असून त्याबाबतचा व्यवहार निश्चित करण्यात आलेला आहे.

तरी सदर शेत जमिनीबाबत कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हिस्सा, वारसा हक्क, दावा, आक्षेप, बोजा, तारण, गहाण, कर्ज, करार, इसारपावती, कुळहक्क, भाडेपट्टा, रास्ता हक्क, न्यायालयीन वाद, अथवा अन्य कोणताही कायदेशीर हक्क असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत संपूर्ण कागदपत्रांसह खालील नमूद पत्त्यावर लेखी स्वरूपात कळवावे. अन्यथा, निर्धारित मुततीत कोणताही दवा अथवा आक्षेप प्राप्त न झाल्यास सदर मालमत्तेबाबत कोणाचाही हक्क अथवा आक्षेप नाही असे समजून माझे पक्षकार पुढील खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर प्राप्त होणारे कोणतेही दावे अथवा आक्षेप ग्राह्य धरले जाणार नाहीत. सबब हे जाहीर प्रगटन

तर्फे
ॲड. बी. डी. कुलकर्णी
मंजुळा नगर, भोकर, ता. भोकर,
जि.नांदेड-४३१८०१
मो.नं. ८८५६८०१२२९.

जाहीर प्रगटन देणार
AEW Smart Service
Private Limited
प्रो. प्रा. आशीष सिंगल,
रा. दिल्ली.

**जाहीर प्रगटन**

**दिवाणी न्यायालय व.स्तर, भोकर, ता. भोकर, जि. नांदेड यांच्या न्यायालयात**

किरकोळ दिवाणी आर.जे.ई. क्रमांक १०९ / २०२६

शोभा दिलीपराव तेललवार व इतर वि. निरंक विरुध्द निरंक

**अर्जदार:-** १. शोभा दिलीपराव तेललवार,
वय ६२ वर्षे, व्यवसाय – घरकाम
रा.भोकर ता.भोकर जि.नांदेड
२. संदिप दिलीपराव तेललवार
वय ४० वर्षे, व्यवसाय – खाजगी नोकरी
रा.भोकर ता.भोकर जि.नांदेड
३. संचिन दिलीपराव तेललवार
वय ३७ वर्षे, व्यवसाय – व्यापार
रा.भोकर ता.भोकर जि.नांदेड
४. दिपाली दिलीपराव तेललवार
रा. संजय हाउसिंग सोसायटी, संकल्प मंगल कार्यालय समोर, उस्मानपुरा, औरंगाबाद ता.जि. औरंगाबाद

गैरअर्जदार:- निरंक

**दावा:- वारसा हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत.** (Application U/sec. 372 of grant of Succession Certificate.)

या जाहीर प्रगटनाव्दारे सर्व संबंधितास कळविण्यात येते की, मयत **दिलीप व्यंकटराव तेललवार** यांचा मृत्यू दिनांक १२/०५/२०२५ रोजी रा.भोकर ता.भोकर जि.नांदेड येथे झाला असून त्यांचे वारस म्हणून १.शोभा दिलीपराव तेललवार , वय ६२ वर्षे, व्यवसाय – घरकाम रा.भोकर ता.भोकर जि.नांदेड २. संदिप दिलीपराव तेललवार वय ४० वर्षे, व्यवसाय – खाजगी नोकरी रा.भोकर ता.भोकर जि.नांदेड ३. संचिन दिलीपराव तेललवार, वय ३७ वर्षे, व्यवसाय – व्यापार रा.भोकर ता.भोकर जि.नांदेड ४. दिपाली दिलीपराव तेललवार रा. संजय हाउसिंग सोसायटी, संकल्प मंगल कार्यालय समोर,उस्मानपुरा, औरंगाबाद ता.जि. औरंगाबाद यांनी या न्यायालयात वारसाहक्क प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

सदर अर्जदारांच्या नावे वारसा हक्क प्रमाणपत्र देण्यासाठी जर कोणाचा आक्षेप असेल तर त्यांनी सदर जाहिरातीच्या प्रसिध्दी पासून एक महिन्याच्या आत भोकर येथील दिवाणी न्यायालयात व स्तर, भोकर येथे लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा. अन्यथा कोणासही आक्षेप नाही असे समजून योग्य तो निर्णय दिला जाईल याची संबंधीतांनी नोंद घ्यावी. सदरील प्रकरणात पुढील तारीख १८/०६/२०२६ रोजी ठेवण्यात आलेले आहे.

आज दिनांक १७/०४/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

कनिष्ठ लिपिक
दिवाणी न्यायालय व.स्तर भोकर.

अधिक्षक
दिवाणी न्यायालय व.स्तर, भोकर.

## जाहीर प्रगटन

सर्वसंबंधित व सर्वसामान्य जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येतेकी, माझे पक्षकार AEW Smart Service Private Limited, SMA Co-operative Industrial Estate, G.T. Karnal Road, Jahangirpuri D Block, North West Delhi-110033, प्रो. प्रा. आशीष सिंगल, रा. दिल्ली यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून हे जाहीर प्रगटन देण्यात येत आहे.

माझे पक्षकार यांनी मौजे शिरूर, ता. उमरी, जि. नांदेड येथील गट क्रमांक ७७ मधील क्षेत्र १.२० हे. आर. आकार रु. ३.८२ पैसे असलेली हणमाबाई संतोष डुबुकवाड यांच्या मालकी हक्कातील व ताब्यातील जमीन कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरवले असून त्याबाबतचा व्यवहार निश्चित करण्यात आलेला आहे.

तरी सदर शेत जमिनीबाबत कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हिस्सा, वारसा हक्क, दावा, आक्षेप, बोजा, तारण, गहाण, कर्ज, करार, इसारपावती, कुळहक्क, भाडेपट्टा, रास्ता हक्क, न्यायालयीन वाद, अथवा अन्य कोणताही कायदेशीर हक्क असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत संपूर्ण कागदपत्रांसह खालील नमूद पत्त्यावर लेखी स्वरूपात कळवावे. अन्यथा, निर्धारित मुततीत कोणताही दवा अथवा आक्षेप प्राप्त न झाल्यास सदर मालमत्तेबाबत कोणाचाही हक्क अथवा आक्षेप नाही असे समजून माझे पक्षकार पुढील खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर प्राप्त होणारे कोणतेही दावे अथवा आक्षेप ग्राह्य धरले जाणार नाहीत. सबब हे जाहीर प्रगटन

तर्फे
ॲड. बी. डी. कुलकर्णी
मंजुळा नगर, भोकर, ता. भोकर,
जि.नांदेड-४३१८०१
मो.नं. ८८५६८०१२२९.

जाहीर प्रगटन देणार
AEW Smart Service
Private Limited
प्रो. प्रा. आशीष सिंगल,
रा. दिल्ली.

## जाहीर प्रगटन

सर्वसंबंधित व सर्वसामान्य जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येतेकी, माझे पक्षकार AEW Smart Service Private Limited, SMA Co-operative Industrial Estate, G.T. Karnal Road, Jahangirpuri D Block, North West Delhi-110033, प्रो. प्रा. आशीष सिंगल, रा. दिल्ली यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून हे जाहीर प्रगटन देण्यात येत आहे.

माझे पक्षकार यांनी मौजे शिरूर, ता. उमरी, जि. नांदेड येथील गट क्रमांक ७९ मधील क्षेत्र २.५८ हे. आर. आकार रु. ३.७६ पैसे असलेली श्री साईनाथ धोंडीबा पडोळे यांच्या मालकी हक्कातील व ताब्यातील जमीन कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरवले असून त्याबाबतचा व्यवहार निश्चित करण्यात आलेला आहे.

तरी सदर शेत जमिनीबाबत कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हिस्सा, वारसा हक्क, दावा, आक्षेप, बोजा, तारण, गहाण, कर्ज, करार, इसारपावती, कुळहक्क, भाडेपट्टा, रास्ता हक्क, न्यायालयीन वाद, अथवा अन्य कोणताही कायदेशीर हक्क असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत संपूर्ण कागदपत्रांसह खालील नमूद पत्त्यावर लेखी स्वरूपात कळवावे. अन्यथा, निर्धारित मुततीत कोणताही दवा अथवा आक्षेप प्राप्त न झाल्यास सदर मालमत्तेबाबत कोणाचाही हक्क अथवा आक्षेप नाही असे समजून माझे पक्षकार पुढील खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर प्राप्त होणारे कोणतेही दावे अथवा आक्षेप ग्राह्य धरले जाणार नाहीत. सबब हे जाहीर प्रगटन

तर्फे
ॲड. बी. डी. कुलकर्णी
मंजुळा नगर, भोकर, ता. भोकर,
जि.नांदेड-४३१८०१
मो.नं. ८८५६८०१२२९.

जाहीर प्रगटन देणार
AEW Smart Service
Private Limited
प्रो. प्रा. आशीष सिंगल,
रा. दिल्ली.

## जाहीर प्रगटन

सर्वसंबंधित व सर्वसामान्य जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येतेकी, माझे पक्षकार AEW Smart Service Private Limited, SMA Co-operative Industrial Estate, G.T. Karnal Road, Jahangirpuri D Block, North West Delhi-110033, प्रो. प्रा. आशीष सिंगल, रा. दिल्ली यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून हे जाहीर प्रगटन देण्यात येत आहे.

माझे पक्षकार यांनी मौजे शिरूर, ता. उमरी, जि. नांदेड येथील गट क्रमांक ७७ मधील क्षेत्र १.८० हे. आर. आकार रु. १.९१ पैसे असलेली श्री दिगांबर संभाजी डुबुकवाड यांच्या मालकी हक्कातील व ताब्यातील जमीन कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरवले असून त्याबाबतचा व्यवहार निश्चित करण्यात आलेला आहे.

तरी सदर शेत जमिनीबाबत कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हिस्सा, वारसा हक्क, दावा, आक्षेप, बोजा, तारण, गहाण, कर्ज, करार, इसारपावती, कुळहक्क, भाडेपट्टा, रास्ता हक्क, न्यायालयीन वाद, अथवा अन्य कोणताही कायदेशीर हक्क असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत संपूर्ण कागदपत्रांसह खालील नमूद पत्त्यावर लेखी स्वरूपात कळवावे. अन्यथा, निर्धारित मुततीत कोणताही दवा अथवा आक्षेप प्राप्त न झाल्यास सदर मालमत्तेबाबत कोणाचाही हक्क अथवा आक्षेप नाही असे समजून माझे पक्षकार पुढील खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर प्राप्त होणारे कोणतेही दावे अथवा आक्षेप ग्राह्य धरले जाणार नाहीत. सबब हे जाहीर प्रगटन

तर्फे
ॲड. बी. डी. कुलकर्णी
मंजुळा नगर, भोकर, ता. भोकर,
जि.नांदेड-४३१८०१
मो.नं. ८८५६८०१२२९.

जाहीर प्रगटन देणार
AEW Smart Service
Private Limited
प्रो. प्रा. आशीष सिंगल,
रा. दिल्ली.

## जाहीर प्रगटन

सर्वसंबंधित व सर्वसामान्य जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येतेकी, माझे पक्षकार AEW Smart Service Private Limited, SMA Co-operative Industrial Estate, G.T. Karnal Road, Jahangirpuri D Block, North West Delhi-110033, प्रो. प्रा. आशीष सिंगल, रा. दिल्ली यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून हे जाहीर प्रगटन देण्यात येत आहे.

माझे पक्षकार यांनी मौजे शिरूर, ता. उमरी, जि. नांदेड येथील गट क्रमांक ७८ मधील क्षेत्र ०.८० हे. आर. आकार रु. ०.९७ पैसे असलेली श्री भगवान विरोजी हुलगुडे यांच्या मालकी हक्कातील व ताब्यातील जमीन कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरवले असून त्याबाबतचा व्यवहार निश्चित करण्यात आलेला आहे.

तरी सदर शेत जमिनीबाबत कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हिस्सा, वारसा हक्क, दावा, आक्षेप, बोजा, तारण, गहाण, कर्ज, करार, इसारपावती, कुळहक्क, भाडेपट्टा, रास्ता हक्क, न्यायालयीन वाद, अथवा अन्य कोणताही कायदेशीर हक्क असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत संपूर्ण कागदपत्रांसह खालील नमूद पत्त्यावर लेखी स्वरूपात कळवावे. अन्यथा, निर्धारित मुततीत कोणताही दवा अथवा आक्षेप प्राप्त न झाल्यास सदर मालमत्तेबाबत कोणाचाही हक्क अथवा आक्षेप नाही असे समजून माझे पक्षकार पुढील खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर प्राप्त होणारे कोणतेही दावे अथवा आक्षेप ग्राह्य धरले जाणार नाहीत. सबब हे जाहीर प्रगटन

तर्फे
ॲड. बी. डी. कुलकर्णी
मंजुळा नगर, भोकर, ता. भोकर,
जि.नांदेड-४३१८०१
मो.नं. ८८५६८०१२२९.

जाहीर प्रगटन देणार
AEW Smart Service
Private Limited
प्रो. प्रा. आशीष सिंगल,
रा. दिल्ली.

**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१, ९८६०७२१३५६

# गोदातीर समाचार

**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308



## 'प्रधानमंत्री पीक विमा' अंतर्गत सोयाबीन पिकासाठी ८८४ कोटी रुपयांच्या मंजूर भरपाईपैकी ४९९ कोटी वितरित

**नांदेड (प्रतिनिधी)** –प्रधानमंत्री पीक विमा योजना (पीएमएफबीवाय) अंतर्गत खरीप हंगाम २०२५–२६ मध्ये सोयाबीन पिकाच्या नुकसानीसाठी नांदेड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना एकूण ८८४.७२ कोटी रुपयांची नुकसानभरपाई मंजूर करण्यात आली आहे. जिल्ह्यातील सर्व ९३ महसूल मंडळे पात्र ठरली असून, ६ लाख ३४ हजार ६२३ शेतकरी अर्जदारांना या योजनेचा लाभ मिळणार आहे. सुमारे ४,४४,८७९.३७ हेक्टर क्षेत्र विमा संरक्षित करण्यात आले होते.

दिनांक ७ मे २०२६ पर्यंतच्या अहवालानुसार सोयाबीन पिकासाठी एकूण ८८४.७२ कोटी रुपये नुकसानभरपाई निश्चित झाली असून, त्यापैकी ४९९.६० कोटी रुपये वितरित करण्यात आले आहेत आणि ३८५.११ कोटी रुपये प्रलंबित आहेत. विमा कंपनीच्या अद्ययावत माहितीनुसार सोयाबीन, मूग, उडीद, तूर आणि ख.ज्वारी या पिकांच्या नुकसानभरपाईसाठी मंजूर रक्कम ८८८.६७ कोटी रुपये असून त्यापैकी ५०२ कोटी रुपये शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात आले आहेत. उर्वरित रक्कम राज्य शासनाकडून विमा कंपनीला प्राप्त झाल्यानंतर तत्काळ वितरित करण्यात येणार आहे.

नुकसानभरपाई निश्चिती प्रक्रियेत असलेली १३ महसूल मंडळे: दिग्रस (बु.), कंधार, इस्लापूर, जलधारा, मांडवी, सिंदगी (मो.), माहूर, सिंदखेड, वाई बाजार, वानोळा, बारड, धानोरा (बु.), नांदेड (शहर).

राज्य शासनाचा हिस्सा प्रलंबित असलेली प्रमुख महसूल मंडळे: मालेगाव (अर्धापूर), भोकर, भोसी, किनी, बिलोली, कुंडलवाडी, देगलूर, खानापूर, मरखेल, धर्माबाद, करखेली, सिरजखोड, निवघा, तळणी, तामसा, जवळगाव, कुरुळा, उस्माननगर, फुलवल, बोधडी, किनवट, उमरी बाजार, सावरगाव नसरत, शेवडी (बा.), सोनखेड, मुदखेड, अंबुलगा (बु.), जांब, मुखेड, मुक्रमाबाद, बरबडा, घुंगराळा, नरसी, नांदेड (ग्रामीण), तरोडा (बु.), वसरणी, विष्णुपुरी, वाजेगाव आणि सिंधी.

दि. २४ जून २०२५ रोजीच्या शासन निर्णयाप्रमाणे सदरची योजना ही एकूण १२ जिल्हा समुहासाठी निवडलेल्या पीक विमा कंपन्यांमार्फत सन २०२५–२६ या एक वर्षाकरिता ८०:११० कप व कॅप मॉडेलनुसार राबविण्यात येत आहे. त्यामध्ये नुकसान भरपाईचे दायित्व संबंधित विमा कंपनीवर राहणार आहे. विमा कंपन्या एका हंगामामध्ये जिल्हा समूहातील एकूण जमा विमा हप्ता रक्कमेच्या ११० टक्के किंवा एकूण विमा संरक्षित रकमेवर बर्न कॉस्टनुसार येणाऱ्या विमा हप्त्याच्या ११० टक्के यापैकी जे जास्त असेल, त्यापर्यंतचे दायित्व स्वीकारतील व यापुढील दायित्व राज्य शासन स्वीकारेल आणि जर देय पीक विमा नुकसान भरपाईची रक्कम जिल्हा समूहामध्ये एकूण जमा विमा हप्ता रकम पेक्षा कमी असेल तर विमा कंपनी जमा विमा हप्ता रक्कमेच्या जास्तीत जास्त २० टक्के रक्कम स्वतःकडे ठेवेल व उर्वरित विमा हप्ता रक्कम राज्य शासनाला विहित वेळेत परत करेल. यानुसार नांदेड जिल्ह्यातील नुकसानभरपाई ११० टक्के पेक्षा जास्त होत असून राज्य शासनाकडून उर्वरित निधी विमा कंपनीला प्राप्त होताच सर्व पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यात नुकसानभरपाईची रक्कम थेट जमा करण्यात येईल. त्यामुळे सर्व सोयाबीन पीक विमा धारक शेतकऱ्यांनी आपले बँक खाते, आधार लिंक माहिती अद्ययावत ठेवावी, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत यांनी केले आहे.

## एलसीबीच्या कारवाईत अडीच लाखांचा मुद्देमाल जप्त, सात जुगाऱ्यांना अटक



**नांदेड (प्रतिनिधी)** –मुदखेड पोलीस ठाण्याच्या हद्दीत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक गस्त घालत असताना मिळालेल्या माहितीवरून त्यांनी एका जुगार अड्ड्यावर कारवाई केली. यावेळी अडीच लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करून सात जणांना अटक केली. त्यांच्याविरुद्ध मुदखेड ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

जिल्ह्यातील फरार आणि पाहिजे असलेल्या आरोपींच्या शोधात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल भोसले यांनी वरिष्ठांच्या आदेशावरून आपले सहकारी अधिकारी पोलीस उपनिरीक्षक महेश कोरे व त्यांच्या पथकाला मुदखेड तालुक्यात रवाना केले. पथक प्रमुख कोरे यांना मिळालेल्या माहितीवरून पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या क्रॅक डाऊन अभियानांतर्गत मुदखेड तालुक्यातील ईजळी शिवारात सुरू असलेल्या एका जुगार अड्ड्यावर कारवाई केली. यावेळी पोलिसांच्या हाती चार जुगारी लागले, तर अन्य जुगारी घटनास्थळावरून पसार झाले. पकडलेल्या जुगाऱ्यांकडून पोलिसांनी एक बुलेट, मोबाईल, रोख रक्कम व जुगाराचे साहित्य असा अडीच लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करून मुदखेड पोलिसांच्या स्वाधीन केले आहे.

मोहमद सलमान मोहमद युनूस (वय २३ वर्षे रा. नवी आबादी मुदखेड), संजय लालू वाळवे (वय ३५ वर्षे रा. फुले नगर धर्माबाद ता. धर्माबाद जि. नांदेड), कपिल सोपान हटकर (वय २५ वर्षे रा. इजळी ता. मुदखेड, जि. नांदेड), शेख अनिस शेख सलीम (वय २५ वर्षे रा. नवी आबादी मुदखेड जि. नांदेड), अमोल विलास हाटकर या रा.ईजळी ता. मुदखेड, फरोज रा. नांदेड, सलीम रा.नांदेड आरोपी क्रमांक ५ ते ७ हे फरार असून मुदखेड पोलीस त्यांचा शोध घेत आहेत.

**नांदासौख्यभरे**

**काळे – पावडे**

जुना कौठा येथील रहिवाशी पंजाबराव काळे पाटील यांची सुकन्या चि. सौ. कां. शारदा हिचा शुभविवाह वसमत तालुक्यातील नहाद येथील रहिवाशी सौ. रत्नमाला व शंकरराव पावडे यांचे सुपुत्र चि. गोविंद यांचेसमवेत गुरूवार, दि. १४ मे २०२६ रोजी सायंकाळी ६:३४ वाजता गुंडेगावकर मंगल कार्यालय, उस्माननगर रोड, नांदेड येथे सानंद संपन्न होत आहे. वधु-वरास हार्दिक शुभेच्छा.

–मुख्य संपादक

## विद्यार्थ्यांच्या भविष्याशी तडजोड अजिबात मान्य नाही

### नीट पुनर्परीक्षेबाबत खा. रवींद्र चव्हाण यांची ठाम भूमिका



**नांदेड (प्रतिनिधी)** – पेपरफुटीमुळे नीट पुनर्परीक्षा घेण्याचा निर्णय जाहीर झाल्यानंतर देशभरातील लाखो विद्यार्थी आणि पालकांमध्ये चिंता निर्माण झाली आहे. विद्यार्थ्यांच्या भविष्याशी तडजोड मान्य नाही, अशी ठाम भूमिका खा. रवींद्र वसंतराव चव्हाण यांनी घेतली आहे.

पेपरफुटीसारख्या गंभीर प्रकारामुळे प्रामाणिक विद्यार्थ्यांच्या मेहनतीवर पाणी फिरू नये. परीक्षा प्रक्रियेतील पारदर्शकता आणि विश्वास टिकवणे ही केंद्र सरकार व संबंधित यंत्रणांची जबाबदारी आहे. दोषींवर कठोर कारवाई झाली पाहिजे, अशी मागणी खासदार चव्हाण यांनी केली. विद्यार्थ्यांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, आत्मविश्वास आणि संयम राखून पुनर्परीक्षेची तयारी करावी, असे आवाहन करून विद्यार्थ्यांच्या न्यायासाठी संसदेत आणि संबंधित स्तरावर ठामपणे आवाज उठवत राहीन. विद्यार्थ्यांच्या भवितव्यासाठी न्याय मिळवून देण्याची लढाई कायम सुरू राहील, असा विश्वास खासदार चव्हाण यांनी व्यक्त केला.

## पोलीस अधिकारी व अंमलदारांसाठी गृहकर्ज योजनेला राज्य बँकेचे १,७६८ कोटींचे अर्थसहाय्य

**नांदेड (प्रतिनिधी)**– राज्यातील पोलीस अधिकारी व अंमलदारांना घर बांधणीसाठी आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्याच्या महत्वपूर्ण निर्णयाला महाराष्ट्र शासनाने मान्यता दिली आहे. गृहविभागाच्या शासन निर्णयानुसार महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळामार्फत पोलीस कर्मचाऱ्यांसाठी घरबांधणी अग्रीम योजने अंतर्गत १ हजार ७६८ कोटींची कर्जे उभारणी करण्यास मंजुरी देण्यात आली.

ही कर्जे उभारणी दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लि. मार्फत करण्यात येणार असून, या योजनेचा लाभ राज्यातील हजारो पोलीस अधिकारी व अंमलदारांना मिळणार आहे. शासनाने यापूर्वी ९७८१ पोलीस अधिकारी व अंमलदारांना या योजने अंतर्गत आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला होता. त्यानंतर सप्टेंबर २०२३ ते ३१ डिसेंबर २०२४ या कालावधीत प्राप्त झालेल्या घरबांधणी अग्रीम प्रस्तावाच्या आधारे आणखी ५,४५९ प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली.

याकरिता गृहनिर्माण मंडळाने सर्व क्षेत्रातील बँकांकडून निविदा मागविल्या होत्या. त्यामध्ये अनेक राष्ट्रीयकृत, खाजगी व सहकारी बँकांनी भाग घेतला होता. परंतु या सर्वामध्ये कमीत कमी व्याजदर व इतर आकर्षक अटी व शर्तीच्या आधारे 'दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँके'ची निविदा अंतिम करण्यात आली. मागील काही वर्षात राज्य सहकारी बँकेने आपल्या आर्थिक प्रगतीत सातत्य ठेवल्यानेच हे शक्य झाले आहे. पोलीस दलातील अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी निवासाच्या प्रश्नावर राज्य शासनाने घेतलेल्या या महत्वाच्या निर्णयाला राज्य सहकारी बँकेने आर्थिक पाठबळ दिल्याने हजारो पोलीस कुटुंबांना स्वतःचे घर मिळण्याचे स्वप्न पूर्ण करण्यास मोठी मदत होणार आहे. अशा उपक्रमांद्वारे राज्य सहकारी बँकेने व्यावसायिक बँकींग बरोबरच आपला सामाजिक बँकींगचा वसा पुढे चालू ठेवला आहे. राज्य सहकारी बँकेने प्रथमच राज्य शासनाच्या अंगीकृत संस्थांच्या टेंडर प्रक्रियेत भाग घेत तेथे यशस्वी ठरल्याबद्दल बँकेच्या सर्व कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. बँकेस ही संधी दिल्याबद्दल विद्याधर अनास्कर यांनी शासनाचे व पोलीस गृहनिर्माण मंडळाचे आभार मानले आहेत.

## वाहेदपूर गावातील स्वगणना १०० टक्के पूर्ण –तहसीलदार रेणुकादास देवणीकर



**अर्धापूर (प्रतिनिधी)** – तालुक्यातील वाहेदपूर या गावात स्वगणना पूर्ण करणारे पहिले गाव ठरले आहे. जिल्हाधिकारी राहूल कर्डीले यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या पहिल्या डिजीटल स्वगणना मोहिमेला वाहेदपूर गावातील नागरिकांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला.

स्वगणना तालुक्यातील वाहेदपूर या गावात १००% करण्याचा संकल्प जनगणना चार्ज अधिकारी तहसीलदार रेणुकादास देवणीकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्वगणना करण्यासाठी पर्यवेक्षक सुनिल गोखले, प्रगणक विनोद भुसे, सरपंच साहेबराव कदम, पोलीस पाटील भरत शेळके यांनी नियोजनबद्ध पद्धतीने काम केले. तसेच या सर्वांचे मोलाचे सहकार्य लाभले. यामुळे अर्धापूर तालुक्यातील वाहेदपूर हे गाव आजघडीला स्वगणना १००% पूर्ण झाले. दरम्यान अर्धापूर तालुक्यातील इतर गावांमधील नागरिकांनीही दिनांक १५ मे २०२६ पर्यंत स्वगणना प्रक्रिया पूर्ण करून डिजीटल मोहिमेत सक्रीय सहभाग नोंदवावा, असे आवाहन जनतेला जनगणना अधिकारी, तहसीलदार रेणुकादास देवणीकर यांनी केले आहे.

## अनोळखी प्रेताची ओळख पटविण्याचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)** –शिवाजीनगर पोलीस स्टेशनच्या हद्दीत मनपा दवाखान्यासमोर एका अनोळखी पुरुषाचे प्रेत आढळून आले आहे. मयत इसमाचे अंदाजे वय ४५ वर्षे असून बांधा सडपातळ आहे. सदर मयत इसमाच्या नातेवाईकांचा शोध न लागल्याने लिंगायत स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

सदरील लांबट चेहऱ्याच्या इसमाने निळ्या रंगाचा पँट व फिकट निळ्या रंगाचा शर्ट परिधान केला होता. सदरील वर्णनाच्या इसमाची ओळख अद्यापपर्यंत पटली नसून वरील वर्णनाच्या व्यक्तीस कुणी ओळखत असल्यास शिवाजीनगर पोलीस स्टेशन येथे संपर्क साधण्याचे आवाहन पोलीस प्रशासनाने केले आहे.

## जिल्हाधिकारी राहूल कर्डिले यांची अर्धापूर तहसील कार्यालयास अचानक भेट

**अर्धापूर (प्रतिनिधी)** –जिल्हाधिकारी राहूल कर्डिले यांनी सोमवार, दि. १२ मे रोजी अर्धापूर तहसील कार्यालयास अचानक भेट देत विविध विभागांच्या कामकाजाची सविस्तर पाहणी केली. यावेळी त्यांनी महसूल विभागासह पंचायत समिती, गट विकास अधिकारी कार्यालय, तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय, रोजगार हमी योजना विभाग, पुरवठा विभाग, उपकोषागार कार्यालय आणि भूमि अभिलेख कार्यालयाला भेटी देऊन कामकाजाचा आढावा घेतला.

तहसील कार्यालयात त्यांनी महसूल विभागातील सर्व कार्यासनांना भेट देत प्रत्येक विभागाच्या जाबचार्टची तपासणी केली. तसेच 'आरटीएस' अंतर्गत नागरिकांना पुरविण्यात येणाऱ्या सेवांची पडताळणी करून प्रकरणे प्रलंबित नसल्याची खात्री केली. अभिलेख कक्षालाही भेट देऊन अभिलेखांच्या नक्कल वितरण प्रक्रियेची पाहणी केली व कामकाज अधिक सुलभ आणि प्रभावी करण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या.

यावेळी तहसील कार्यालयाच्या सभागृहात शासकीय जमिनींच्या अभिलेख पडताळणीसाठी विशेष शिबीर सुरू होते. नायब तहसीलदार, मंडळ अधिकारी आणि कर्मचारी विविध गटांच्या नोंदींची पडताळणी करत होते. जिल्हाधिकाऱ्यांनी या कामाचा आढावा घेत उपस्थित अधिकारी-कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले. तसेच तहसील कार्यालयाच्या एकूण कामकाजाबद्दल समाधान व्यक्त केले.

त्यानंतर पंचायत समिती कार्यालयात प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत घरकुल योजनांची माहिती घेतली. शासकीय जमिनींवर निवासी प्रयोजनासाठी झालेल्या अतिक्रमणांच्या याद्या तयार करण्यात आल्या आहेत का, याबाबतही त्यांनी विचारणा केली. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) विभागाच्या कामांची माहिती घेऊन अपूर्ण कामे तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. याशिवाय उपकोषागार कार्यालय, भूमी अभिलेख कार्यालय आणि पुरवठा विभागाचीही पाहणी करण्यात आली. पुरवठा विभागाकडून इष्टांकासंदर्भातील माहिती घेऊन आवश्यक सूचना देण्यात आल्या. या पाहणी दौऱ्यावेळी तहसीलदार रेणुकादास देवणीकर, नायब तहसीलदार राजेंद्र शिंदे, आश्विनी केंद्रे, पुरवठा निरीक्षक दिनेश खंदारे, अव्वल कारकून विश्वंभर सोळंके, तलाठी लक्ष्मण देशमुख यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.





## सिडकोत श्री भगवान बालाजींच्या ३६ व्या ब्रम्होत्सवाचे १८ ते २५ मे दरम्यान आयोजन



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** – सिडको येथील भगवान बालाजींच्या ३६ व्या ब्रम्होत्सवाचे आयोजन दि. १८ ते २५ मे दरम्यान करण्यात आले आहे. यात होमहवन विधी व श्रीमद् भागवत पारायण भागवताचार्य हभप कलिंदीताई पंढरपूरकर व हभप अशोक महाराज पुयड आळंदीकर यांच्या मधुर वाणीतून दुपारी १ ते ४ दरम्यान होणार आहे.

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी सिडको येथील भगवान बालाजी मंदिरात ३६ वा वार्षिक ब्रम्होत्सव आयोजित करण्यात आला आहे. दि. २१ ते २५ मे दरम्यान आचार्य पंडित सतीश गुरू पोतदार व मंदिर पुजारी दिव्यांशु महाराज यांच्या आचार्य तत्त्वाने सकाळी अभिषेक, होमहवन दुपारी १ ते ४ वाजेपर्यंत भागवताचार्य हभप कलिंदीताई पंढरपूरकर व हभप अशोक महाराज पुयड आळंदीकर यांच्या मधुर वाणीतून भागवत कथा दि. २४ मे रोजी सायंकाळी ७ वाजता श्री भगवान बालाजी व लक्ष्मी पद्मावती उत्सव मूर्तीची मिरवणूक मंगलगिरी वाहनातून मुख्य रस्त्याने डॉ रायेवर यांचा दवाखाना शिवमंदिर संभाजी चौक मार्गे मंदिराकडे येणार आहे. या मिरवणुकीत भजनी मंडळ, महिला, पुरुष सहभागी राहणार असून, रात्री ९ वाजता कल्याण उत्सव व श्री भगवान बालाजी लक्ष्मी पद्मावती विवाह सोहळा पार पडणार आहे. दि. २५ मे रोजी सकाळी महाभिषेक आरती तीर्थ प्रसाद होमहवन पूर्णाहुती ब्राम्हण सन्मान महाआशीर्वाद सकाळी ११ ते १.३० दरम्यान हभप अशोक महाराज पुयड आळंदीकर यांचे काल्याचे कीर्तन व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे, या महोत्सवात भाविकांनी सहभागी व्हा, असे आवाहन साहेबराव जाधव, बाबुराव बिरादार, व्यंकटराव हाडोळे तुकाराम नांदेडकर, आनंद बासटवार, डॉ. नरेश रायेवर, गोविंद सुंकेवार, वैजनाथ म ेरलवार, रामचंद्र कोटलवार, पुंडलिक बिरादार व सर्व उत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## तालुक्यात स्वजनगणना १०० टक्के व्हावी यासाठी पर्यवेक्षकांनी गावे दत्तक घ्यावीत –तहसीलदार परळीकर



**लोहा (प्रतिनिधी)** – लोहा तालुक्यातील जनगणना पर्यवेक्षकांची गाव दत्तक घेऊन स्वजनगणना करण्यासाठी जन जागृती करावी व १०० टक्के त्या गावात स्वजनगणना व्हावी यासाठी प्रयत्नशील असावे, असे आवाहन तहसीलदार विठ्ठल परळीकर यांनी केले आहे.

जनगणना चार्ज अधिकारी तथा तहसीलदार परळीकर यांनी लोहा तालुक्यात शहर वगळता ग्रामीण भागात जनगणनेच्या कामासाठी ७१ पर्यवेक्षक नियुक्त केले आहेत. त्यांची बैठक मंगळवार, दि. १२ मे रोजी तहसील कार्यालयात पार पडली. प्रत्येक पर्यवेक्षक यांनी आपल्या सर्कलमधील एक गाव दत्तक घेऊन १५ तारखेपर्यंत गावात १००% स्वगणना करून घ्याव्यात. स्वगणना करण्यासाठी संबंधित प्रगणक यांची मदत घ्यावी. तसेच १ मे ते १५ मे पर्यंत उपलब्ध असलेल्या विशेष सुविधेचा लाभ घेण्याचे आवाहन तहसीलदार परळीकर यांनी बैठकीत केले. येणाऱ्या अडीअडचणी बाबत चर्चा झाली. तालुक्यातील नागरिकांनी जास्तीत जास्त स्वगणना करून राष्ट्रीय कार्यात सक्रीय सहभाग घ्यावा, असेही आवाहन करण्यात आले.

जनगणनेच्या कामासाठी प्रशासनाची पूर्ण तयारी झाली आहे. ग्रामीण भागातील जनगणनेसाठी एकूण ४६५ पर्यवेक्षक आणि प्रगणक नेमण्यात आले असून, १६ मे पासून सुरवात होणार आहे.

## रेल्वे स्थानक परिसरात स्वच्छता अभियान

**नांदेड (प्रतिनिधी)** –येथील हुजूर साहिब रेल्वे स्थानकाच्या दोन्ही बाजूंच्या प्रवेश व निर्गमन मार्गांजवळ विखुरलेला कचरा तसेच अस्वच्छतेबाबत अलीकडे प्रसारमाध्यमांमध्ये प्रसिद्ध झालेल्या वृत्तांची दखल घेण्यात येऊन स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

स्थानकाबाहेरील परिसरात विखुरलेला कचरा व अस्वच्छ परिस्थितीमुळे प्रवासी तसेच स्थानिक नागरिकांनी व्यक्त केलेल्या चिंतेची रेल्वे प्रशासनाने गांभीर्याने दखल घेतली आहे. हुजूर साहिब नांदेड हे महत्त्वाचे प्रवेशद्वार शहर तसेच प्रमुख धार्मिक तीर्थक्षेत्र असल्याने स्थानक परिसराची स्वच्छता व चांगली प्रतिमा राखणे हे प्राधान्याचे विषय आहेत.

ज्या ठिकाणी कचरा साचलेला दिसून येत आहे ती ठिकाणे रेल्वेच्या अधिकारक्षेत्राबाहेर असून, संबंधित नागरी प्रशासनाच्या कार्यक्षेत्रात येतात, हे स्पष्ट करण्यात येत आहे. तरीदेखील प्रवासी व सर्वसामान्य नागरिकांच्या सोयीसाठी संबंधित महानगरपालिका प्रशासनाशी रेल्वे अधिकाऱ्यांचा नियमित समन्वय सुरू असून, तत्काळ स्वच्छता मोहीम राबविणे व सातत्याने स्वच्छता राखण्याबाबत विनंती करण्यात आली आहे.

स्थानक परिसरातील हॉटेल्स, दुकाने व व्यावसायिक आस्थापनांनी कचरा टाकणे टाळावे तसेच कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावावी, जेणेकरून स्थानक परिसराची स्वच्छता कायम राखता येईल. सदर प्रभावित ठिकाणे रेल्वे हद्दीबाहेर असल्यामुळे कचरा टाकणाऱ्या संबंधित व्यक्तींवर रेल्वेकडून दंडात्मक कारवाई करता येणे शक्य नाही. मात्र परिस्थितीत लवकरात लवकर सुधारणा व्हावी यासाठी संबंधित स्थानिक प्रशासनाशी सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे. प्रवासी व नागरिकांनीही स्वच्छता राखण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४

ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com